सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## सन-२०२५-२०२६

## ग्रामविकास विभाग

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

२०२५

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## सन-२०२५-२०२६

### ग्रामविकास विभाग

# अनुक्रमणिका

## ग्रामविकास विभाग


| | | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| **१.** | **प्रस्तावना** | | (सात) |
| | १. | ग्रामविकास विभाग (आस्थापना-आस्था-१) .. .. .. .. .. | १ |
| | २. | अधिकारांचे पंचायत राज संस्थांकडे विकेंद्रीकरण (पंरा-१) .. .. .. | १ |
| | ३. | ग्रामविकास विभागातील पंचायत राज संस्थांबाबतचा रचनात्मक तक्ता (आस्था-३) .. .. | ३ |
| | ४. | ग्रामविकास विभाग प्रधान शीर्षवार सारांश (प्रस्तावित/अंदाजित)- तक्ता-१ .. .. .. | ४ |
| | ५. | ग्रामविकास विभाग उद्दिष्टनिहाय वर्गीकरण तक्ता-२ .. .. .. .. .. | ६ |
| | **६.** | **ग्रामविकास विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना..** .. .. .. | ७ |
| | **अ.** | **राज्य पुरस्कृत योजना** | |
| | १. | जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रशासकीय व निवासी इमारतीच्या बांधकामासाठी सहाय्यक अनुदाने (बांधकाम-४) .. | ७ |
| | २. | ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र लघू औद्योगिक प्रशिक्षण संस्था केंद्रे (योजना-११).. .. .. | ७ |
| | ३. | यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान (पंरा-१) .. .. .. .. | ८ |
| | ४. | ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम .. .. .. .. .. | ९ |
| | ५. | मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा पुरविणे (योजना-६) .. | १० |
| | ६. | प्रशिक्षण योजना (आस्था-१५) .. .. .. .. .. .. | १३ |
| | ७. | ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे किमान वेतन (पंरा-३) .. .. .. .. | १५ |
| | ८. | मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (बांधकाम-४) .. .. .. .. .. | १७ |
| | ९. | श्रीमती सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना (योजना-३) .. .. | १७ |
| | १०. | जिल्हा परिषद व पंचायत समिती इमारतींच्या देखभाल दुरुस्ती करणेबाबत (बांधकाम-४) .. | १८ |
| | ११. | माहिती तंत्रज्ञान कक्ष .. .. .. .. .. .. | १८ |
| | १२. | आर. आर. (आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना (योजना-११) .. .. .. | २० |
| | १३. | मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना .. (बांधकाम-४) .. | २० |
| | १४. | रस्ते, पूल दुरुस्ती व परिरक्षण (बांधकाम-३) .. .. .. .. .. | २१ |
| | १५. | अतिवृष्टी व पूरहानी कार्यक्रम (बांधकाम-३) .. .. .. .. .. | २१ |
| | १६. | स्टार्ट-अप ग्रामीण उद्योजकता कार्यक्रम-महाराष्ट्र (योजना-३) .. .. .. | २१ |
| | १७. | अस्मिता योजना (योजना-३).. .. .. .. .. .. .. | २२ |
| | १८. | थोर राष्ट्रपुरुष किंवा प्रसिद्ध व्यक्ती यांच्या नावे स्मारक उभारणे (योजना-११) .. .. | २२ |
| | १९. | कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम (योजना-११) .. .. .. .. | २३ |
| | २०. | ग्रामविकास विभागांतर्गत योजनांची जाहिरात व प्रसिद्धी कार्यक्रम योजना (योजना-११) .. | २४ |
| | २१. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (योजना-११) .. .. | २४ |
| | २२. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजना (योजना-११) .. | २५ |
| | २३. | संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा-समृद्धी योजना (आस्था-५) .. .. | २५ |
| | **ब.** | **केंद्र-राज्य पुरस्कृत योजना** | |
| | १. | महालक्ष्मी सरस प्रदर्शन आणि विभागीय जिल्हास्तरीय प्रदर्शने (योजना-१) .. .. | २६ |
| | २. | जिल्हा व तालुकास्तरीय कायमस्वरूपी तालुका विक्री केंद्रे बांधणे (योजना-१) .. .. | २६ |
| | ३. | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-प्रशासन (योजना-५) .. .. .. | २७ |
| | ४. | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (योजना-३) .. .. .. .. | २७ |
| | ५. | दिनदयाळ उपाध्याय-ग्रामीण कौशल्य योजना (योजना-३) .. .. .. .. | २९ |
| | ६. | प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) (पूर्वीची इंदिरा आवास योजना) (योजना-१०) .. .. | ३० |
| | ७. | राष्ट्रीय रूरबन अभियान (योजना-१) .. .. .. .. | ३१ |

**अनुक्रमणिका** (समाप्त)

**क. केंद्र पुरस्कृत योजना**

१. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (प्रमंग्रासयो) (बांधकाम-२) .. .. .. ३३
२. राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान (आस्था-१५) .. .. ३४
३. सांसद आदर्श ग्रामयोजना (योजना-५) .. .. .. .. ३४
४. नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत व्यवस्थापन कार्यक्रम (योजना-५) .. .. ३५
५. केंद्रीय स्वामित्व योजना (पंरा-४) .. .. .. .. ३७
६. राष्ट्रीय पंचायत पुरस्कार (पंरा-१) .. .. .. .. ३९

२. **पंचायत राज संस्थांना स्व-उत्पन्नविषयक बाबींसाठी अर्थसहाय्य** (वित्त-२, वित्त-३ व वित्त-४).. ४०

३. **ग्रामविकास विभागातील योजनांबाबत माहिती दर्शविणारी परिशिष्टे/विवरणपत्रे/प्रपत्रे :--**

**अ) राज्य पुरस्कृत योजनांची माहिती दर्शविणारी परिशिष्टे**

१. जिल्हा परिषद व पंचायत समिती प्रशासकीय इमारती बांधकामाचे विवरणपत्र (परिशिष्ट अ) (बांधकाम-४) .. ४७
२. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवासी इमारत बांधकामाचे विवरणपत्र (परिशिष्ट ब) (बांधकाम-४) .. ४७
३. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या रस्त्यांचा तपशील (परिशिष्ट क) ४८
४. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत आतापर्यंत उपलब्ध झालेल्या निधीचा तपशील (परिशिष्ट ड) ४८
५. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान प्रगती अहवाल (परिशिष्ट ई) (योजना-३) .. ४८

**ब) केंद्र-राज्य पुरस्कृत योजनांची परिशिष्टे**

१. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांमध्ये मंजूर करण्यात आलेली पदे व त्यांची वेतनश्रेणी (परिशिष्ट-अ) (योजना-५) .. .. .. .. .. ५१
२. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना) प्रगती अहवाल (परिशिष्ट-ब) (योजना-३) .. .. .. ५२
३. महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन (परिशिष्ट-क) (योजना-१०) .. .. .. ५२
४. प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत झालेली आर्थिक व भौतिक प्रगती.. (परिशिष्ट-ड) .. .. ५२

**क) केंद्र पुरस्कृत योजनांची विवरणपत्रे**

१. राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रमासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात प्राप्त झालेल्या/वितरित निधीचा तपशील (विवरणपत्र-१) (योजना-५) .. .. ५५

**ड) ग्रामविकास विभागातील पदांसंदर्भातील माहिती दर्शविणारी प्रपत्रे**

१ ग्रामविकास विभागाच्या आस्थापनेवरील राजपत्रित / अराजपत्रित पदांची माहिती (प्रपत्र-अ) (आस्था-१) .. .. ५९
२. जिल्हा परिषदांचा सुधारित अधिकारी व अराजपत्रित कर्मचारी आकृतीबंध (प्रपत्र-ब) (आस्था-३ व आस्था-४) .. .. .. ६१
३. जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या लेख्यांसाठी कर्मचारी वर्ग (प्रपत्र-क) (आस्था-१०) .. .. .. ६३
४. विभागीय आयुक्त (विकास शाखा) कार्यालयासाठी पदे, पदनाम व पदांची संख्या (प्रपत्र-ड) (आस्था-९) .. ६४

# ग्रामविकास विभाग

## १. प्रस्तावना

ग्रामविकास विभागाची स्थापना दि. १ मे १९६० रोजी झाली. तथापि, कालांतराने ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्र. रवका-१०९२/प्र.क्र. १२१७/०३ए, दिनांक १६-९-१९९२ अन्वये जलसंधारण विभाग ग्रामविकास विभागाशी संलग्न करण्यात येवून ग्रामविकास विभाग' हा ग्रामविकास व जलसंधारण विभाग' म्हणून संबोधला जावू लागला. सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. शाकानि २०१७/प्र. क्र. १२०/१८ (र.व का.) दि. २६-१०-२०१७ अन्वये **ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे विभाजन करून ग्रामविकास विभाग आणि मृद व जलसंधारण विभाग असे दोन स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आले आहेत.**

या प्रकाशनात ग्रामविकास विभागामध्ये कार्यान्वित होणारी कार्ये व कार्यक्रमाबाबतचे २०२४-२५ चे 'कार्यक्रम अंदाजपत्रक' तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. या कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये, या विभागाने ज्या कार्यक्रमांसाठी निधीची विशिष्ट मागणी केली आहे. त्या सर्व विकास कार्यक्रमांचा समावेश आहे.

जिल्हा परिषदांचे व पंचायत समित्यांचे प्रशासन, 'प्रशासकीय विभाग' म्हणून 'महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१' मधील तरतुदीनुसार तसेच 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या तरतुदीनुसार त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीचे प्रशासन, 'मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८' मधील तरतुदीनुसार करण्याची जबाबदारी 'ग्रामविकास विभागाची' आहे. त्याशिवाय या अधिनियमातील संबंधित कलमांनुसार या संस्थांकडे सुपूर्द केलेले कार्यक्रम व योजना कार्यान्वित करण्यासाठी निरनिराळी देय अनुदानेदेखील दिली जातात.

**(१) ग्रामविकास विभाग** च्या अंतर्गत खाली दर्शविल्याप्रमाणे कार्यक्रम राबविले जातात :

**(अ) राज्य पुरस्कृत योजना**

१. नवनिर्मित जिल्हा परिषद/पंचायत समिती प्रशासकीय व निवासी इमारत बांधकामांसाठी सहाय्यक अनुदाने
२. ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र, लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था केंद्रे.
३. यशवंत पंचायत राज अभियान
४. ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम
५. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील मुलभूत सुविधा पुरविणे
६. आपले सरकार कक्ष
७. प्रशिक्षण योजना
८. ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य यांचे मानधन व इतर भत्ते व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे किमान वेतन
९. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना
१०. श्रीमती सुमतीबाई सूकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना
११. जिल्हा परिषद व पंचायत समिती इमारतीचा देखभाल दुरुस्ती करणेबाबत
१२. माहिती तंत्रज्ञान कक्ष
१३. आर. आर. (आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार योजना
१४. मा. बाळासाहेब ठाकरे मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना
१५. रस्ते, पूल दुरूस्ती व परिरक्षण
१६. स्टार्टअप ग्रामीण उद्योजकता कार्यक्रम-महाराष्ट्र
१७. अस्मिता-योजना
१८. थोर राष्ट्रपुरुष किंवा व्यक्ती यांच्या नावे स्मारक उभारणे
१९. कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम
२०. ग्रामविकास विभागांतर्गत योजनांची जाहिरात व प्रसिद्धी कार्यक्रम
२१. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना
२२. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजना
२३. संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा-समृद्धी योजना

**ब. केंद्र-राज्य पुरस्कृत योजना**

१. महालक्ष्मी सरस प्रदर्शन व विक्री केंद्रे

२. जिल्हा व तालुकास्तरीय कायमस्वरुपी विक्री केंद्रे बांधणे

३. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-प्रशासन

४. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

५. दिनदयाळ उपाध्याय-ग्रामीण कौशल्य योजना

६. प्रधानमंत्री आवास योजना

७. राष्ट्रीय रूरबन अभियान

**क. केंद्र पुरस्कृत योजना**

१. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना

२. राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान

३. राष्ट्रीय बायोगॅस विकास व खत व्यवस्थापन विकास कार्यक्रम

४. सांसद आदर्श ग्रामयोजना

५. केंद्रीय स्वामित्व योजना

६. राष्ट्रीय पंचायत पुरस्कार योजना

या योजना राबविल्या जातात.

जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती या पंचायत राज संस्थांचे कामकाज ज्या नियमानुसार किंवा शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार चालते त्यासंबंधी विस्तृत माहिती संबंधित प्रकरणांमध्ये देण्यात आली आहे.

कार्यक्रम अंदाजपत्रकाच्या तंत्राचे स्वरूप लक्षात घेवून प्रत्येक कार्यक्रम, 'राज्य पुरस्कार योजना', 'केंद्र-राज्य पुरस्कृत योजना' व 'केंद्र पुरस्कृत योजना' अशा स्वतंत्र भागांत सादर केला आहे. या सर्व योजनांबाबतची सांख्यिकीय माहिती, या कार्यक्रम अंदाजपत्रकाच्या शेवटी परिशिष्ट, विवरणपत्रे व प्रपत्रामध्ये देण्यात आली आहे.

कार्यक्रम अंदाजपत्रक म्हणजे 'मूल्यमापन अहवाल' नव्हे, तरीही ग्रामविकास विभागाकडून कार्यान्वित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे स्वरूप लक्षात घेवून उपलब्ध असलेल्या अद्ययावत माहितीच्या आधारे निरनिराळ्या कामांची कृतीविषयक माहिती या प्रकाशनात देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

———————

## १. ग्रामविकास विभाग (आस्थापना)

प्रधान सचिव (ग्रामविकास व पंचायत राज) हे ग्रामविकास विभागाचे प्रशासकीय प्रमुख असून त्यांच्या अधिनस्त मंत्रालयीन स्तरावर सह सचिव, उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी व इतर संवर्गातील (उप सचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी दर्जाचे) राजपत्रित अधिकारी कार्यरत आहेत. तसेच, मंत्रालयीन स्तरावर ग्रामविकास विभागात गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गासह असे एकूण २७४ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. यामध्ये प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे राज्यस्तरीय नियंत्रण करण्यासाठी एक सचिव दर्जाचे (अभियंता संवर्गाचे) पद असून, मुख्य अभियंता पदासह मुख्य अभियंता कार्यालयात २६ स्वतंत्र पदे निर्माण केलेली आहेत. त्यानुसार विभागाचे प्रशासकीय कामकाज चालते. **(प्रपत्र-अ)**

[जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती व पंचायती राज संस्था ग्रामविकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली येतात. त्यांचे कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली स्वतंत्र राज्यस्तरीय आयुक्तालय नाही. त्यामुळे या संस्थांवर देखरेख ठेवण्याचे, त्यात समन्वय साधण्याचे व नियंत्रण ठेवण्याचे काम संबंधित कायद्यान्वये व शासनाच्या प्रशासकीय आदेशानुसार विभागीय आयुक्त यांचेकडे सोपविण्यात आलेले आहे.]

## २. अधिकारांचे पंचायत राज संस्थांकडे विकेंद्रीकरण (पंरा-१)

दिनांक २० एप्रिल, १९९३ रोजी झालेल्या ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार भारतीय राज्यघटनेमध्ये भाग ९ अंतर्भूत करण्यात आला आहे. तसेच त्यातील अनुच्छेद २४३-जी अन्वये राज्याचे विधिमंडळ कायदे करून स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार प्रदान करत असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वयंपूर्ण होण्याच्यादृष्टीने अधिकारांचे पंचायत राज संस्थांकडे विकेंद्रीकरण करण्यासाठी घटनेतील अनुसूची ११ मधील २९ विषय पंचायत राज संस्थांकडे हस्तांतरित करावयाचे आहेत. त्यानुसार राज्य शासनाने निरनिराळ्या विभागाकडील आजपर्यंत २९ विषयांपैकी १४ विषय व संबंधित योजना कर्मचाऱ्यांसह जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केल्या आहेत व उर्वरित विषयांच्या हस्तांतरणाची कार्यवाही संबंधित विभागाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

ग्रामविकास तथा पंचायत राज विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली राज्यात एकूण ३४ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या आणि २७९५० ग्रामपंचायती आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी प्रत्येक जिल्हा परिषदेचे प्रशासकीय प्रमुख म्हणून व त्यासोबत केंद्र शासनाच्या योजना जिल्हास्तरावर राबविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे अध्यक्ष म्हणूनही काम पाहतात. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व खात्यांचे प्रमुख अधिकारी कार्यरत आहेत. तसेच पंचायत समिती स्तरावर गटविकास अधिकारी हे प्रमुख असून राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीचा सचिव म्हणून ग्रामसेवक कार्यरत आहेत. याशिवाय राज्यातील सर्व जिल्हा परिषदा तसेच पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीमधे कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती **(प्रपत्र ब, क)** मध्ये देण्यात आली आहे. सोबत विवरणपत्रे १ ते ५ जोडले आहे. या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत पंचायत राज व्यवस्थेचे कामकाज पाहिले जाते.

जिल्हा परिषदांचे व पंचायत समित्यांचे प्रशासन, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील तरतुदीनुसार त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीचे प्रशासन मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतुदीनुसार चालविण्याची जबाबदारी ग्रामविकास विभागाची आहे.

पंचायती राज संस्थांसाठी शासकीय नियंत्रक विभाग म्हणून ग्रामविकास विभागाची कार्ये स्थुलमानाने पुढीलप्रमाणे आहेत :-

१. पंचायती राज संस्थाच्या वैधानिक, घटनात्मक व धोरणाविषयक प्रकरणासंबंधात कार्यवाही करणे आणि या संस्थांशी

निगडित सर्वसाधारण अडचणी हाताळणे.

२. शासनाच्या कार्य नियमावलीनुसार सोपविण्यात आलेल्या योजनांची अंमलबजावणी करणे.

३. पंचायती राज संस्था व इतर शासकीय विभाग यांच्यातील समन्वय साधणे.

वर उल्लेखिलेल्या कर्तव्यांच्या अनुरोधाने खुद्द ग्रामविकास विभागाचे कामकाज पुढीलप्रमाणे चालते :--

* ग्रामविकास विभागसंबंधी अंतर्गत कार्यालयीन व्यवस्था आणि आस्थापना.
* महाराष्ट्र विकास सेवा, घटना वर्गीकरण, सेवा प्रवेश इत्यादी.
* जिल्हा परिषदांची आस्थापनाविषयक प्रकरणे (स्टाफींग पॅटर्न, सेवा वर्गीकरण, नवीन जागा निर्माण करणे, सेवा प्रवेश इत्यादी.)
* जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांचे घटनात्मक कार्य, शिवाय वैधानिक आणि जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे दुरुस्त्याविषयक कार्य.
* विधानमंडळ सदस्यांची पंचायती राज समिती, विचारविनियम समिती आणि जिल्हा परिषदांचे वार्षिक अहवाल या संबंधीची कामे.
* जिल्हा परिषदेकडे व पंचायत समितीकडे असलेल्या वाहनासंबंधी त्याचप्रमाणे आयुक्तांच्या कचेऱ्यातील वाहनांसंबंधीची प्रकरणे.
* जिल्हा परिषदा, पंचायत समिती व ग्रामपंचायतीचे अधिकारी, कर्मचारी, बिनसरकारी अधिकारी, पदाधिकारी व सदस्य यांच्या प्रशिक्षणविषयक प्रकरणे.
* जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांच्या निवडणुका व त्याविषयक निर्माण होणारे विवाद/तंटे.
* पंचायत राज संस्थांमार्फत राज्य पुरस्कृत, केंद्र-राज्य पुरस्कृत व केंद्र पुरस्कृत योजना राबविल्या जातात व त्याचे संनियंत्रण ग्रामविकास विभागाद्वारे केले जाते.

ग्रामविकास विभागातील पंचायतीराज संस्थांबाबतचा **रचनात्मक तक्ता,** ग्रामविकास विभागाचा प्रधान शीर्षवार सारांश (प्रस्तावित/अंदाजित **तक्ता-१)**, ग्रामविकास विभाग उद्दिष्टनिहाय वर्गीकरण **तक्ता-२**, पुढीलप्रमाणे देण्यात आला आहे.

———————

## ३. ग्रामविकास विभाग

### रचनात्मक तक्ता



तक्ता १

ग्रामविकास विभाग

**४. प्रधान शीर्षवार सारांश (प्रस्तावित/अंदाजित)**

(रुपये हजारात)

| प्रधान शीर्ष | | प्रत्यक्ष रकमा २०२३-२४ | अर्थसंकल्प अंदाज २०२४-२५ | सुधारित अंदाज २०२४-२५ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|
| (१) | | (२) | (३) | (४) | (५) |
| **ए- महसुली लेख्यावरील खर्च-** | | | | | |
| २०४९. व्याज प्रदान | भारित | १०२६१६३५ | २८४८०७९३ | २३२३३२७३ | २०४४६७३३ |
| २०५३. जिल्हा प्रशासन | भारित | .. | १०० | ८० | १०० |
| | दत्तमत | ७५७३६२८२ | ९७६६००८७ | ९५१२५६१७ | १०६५१२१४२ |
| २०५९. सार्वजनिक बांधकामे | दत्तमत | ४७७३०० | ५०४६०१ | ३८०२२० | १०६०००० |
| २२३५. सामाजिक सुरक्षा व कल्याण | दत्तमत | २६३०० | ३५००१ | ३५००१ | ३६००१ |
| २४१५. कृषिविषयक संशोधन व शिक्षण | दत्तमत | १००४८६ | १२१७५१ | ११७८७१ | १३०५८१ |
| २५०१. ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम | दत्तमत | २३०८१७२८ | १३७३०५६५ | १८७६९६१५ | १९३६४००४ |
| २५०५. ग्रामीण सेवायोजन | दत्तमत | ८२१९९१२ | २०२७४५०० | ५४०८८३७२ | ५६०००००० |
| २५१५. इतर ग्रामीण विकास कार्यक्रम | दत्तमत | ७८२५०१३२ | ६४२४४७८६ | ८०४६५०७३ | ६७९१३२५५ |
| २८१०. अपारंपरिक ऊर्जा साधने | दत्तमत | .. | १८३८०० | १००००० | १००००० |
| ३०५४. मार्ग व पूल | दत्तमत | १०६८२४५३ | ९५३०६७० | ५३९२६४७ | ९८०५९५२ |
| ३४५१. सेक्रेटरिएट-आर्थिक सेवा | दत्तमत | २५४३३३ | ११६३६०४ | ७४४५४८ | ७९१४४३ |
| ३६०४. स्थानिक संस्था व पंचायत राज | भारित | ९६५०३८१ | ७६००५४४ | ८७०१५३५ | ७६००५४४ |
| संस्था यांना नुकसानभरपाईच्या | दत्तमत | ५१०४९९८ | ६१०१६४० | १९५५७२०९ | ६१०१६४० |
| **एकूण ए-महसुली लेख्यावरील खर्च** | **भारित** | **१९९१२०१६** | **३६०८१४३७** | **३१९३४८८८** | **२८०४७३७७** |
| | **दत्तमत** | **२०१९३३९२४** | **२१३५५१००५** | **२७४७७६१७३** | **२६७८१५०१८** |
| **एकूण** | | **२२१८४५९४०** | **२४९६३२४४२** | **३०६७११०६१** | **२९५८६२३९५** |

तक्ता १ (पुढे चालू)

ग्रामविकास विभाग

**प्रधान शीर्षवार सारांश (प्रस्तावित/अंदाजित)**

(रुपये हजारात)

| प्रधान शीर्ष (१) | | प्रत्यक्ष रकमा २०२३-२४ (२) | अर्थसंकल्प अंदाज २०२४-२५ (३) | सुधारित अंदाज २०२४-२५ (४) | अर्थसकल्पीय अंदाज २०२५-२६ (५) |
|---|---|---|---|---|---|
| **बी-भांडवली लेख्यावरील खर्च --** | | | | | |
| ४५१५. इतर ग्रामविकास कार्यक्रम यावरील भांडवली खर्च | दत्तमत | .. | ५००००१ | ३५०००१ | २५०००० |
| ५०५४. मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च | दत्तमत | ४२४०१८२३ | ७२२२६००८ | ६४२०७५९० | ८३५२३८०० |
| **एकूण बी-भांडवली लेख्यावरील खर्च** | भारित | .. | .. | .. | .. |
| | दत्तमत | **४२४०१८२३** | **७२७२६००९** | **६४५५७५११** | **८३७७३८००** |
| **एकूण** | .. | **४२४०१८२३** | **७२७२६००९** | **६४५५७५११** | **८३७७३८००** |
| **सी-ऋण शीर्षाखालील खर्च --** | | | | | |
| ६२१६. गृहनिर्माण कर्जे | दत्तमत | १९५५० | २०००० | ११४१३७ | ९०००० |
| ७६१०. शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे | दत्तमत | ५००६७ | ४०१६० | १०७६९० | ५०१६० |
| **एकूण सी-ऋण शीर्षाखालील खर्च** | भारित | .. | .. | .. | .. |
| | दत्तमत | ६९६१७ | ६०१६० | २२१८२७ | १४०१६० |
| **एकूण** | .. | **६९६१७** | **६०१६०** | **२२१८२७** | **१४०१६०** |
| **स्थूल बेरीज-ग्रामविकास विभाग** | भारित | १९९१२०१६ | ३६०८१४३७ | ३१९३४८८८ | २८०४७३७७ |
| | दत्तमत | २४४४०५३६४ | २८६३३७१७४ | ३३९५५५५९१ | ३५१७२८९७८ |
| **एकूण** | .. | **२६४३१७३८०** | **३२२४१८६११** | **३७१४९०४७९** | **३७९७७६३५५** |

६

तक्ता २

ग्रामविकास विभाग

**उद्दिष्टवार वर्गीकरण**

(आकडे हजारात)

| उद्दिष्ट | प्रत्यक्ष रकमा २०२३-२४ | अर्थसंकल्प अंदाज २०२४-२५ | सुधारित अंदाज २०२४-२५ | अर्थसकल्पीय अंदाज २०२५-२६ |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| (१) वेतन | १७३९४१८ | २२८७०३१ | २०७५६०० | २५८८७१७ |
| (२) मजुरी | .. | .. | .. | .. |
| (३) अतिकालीक भत्ता | २६९ | ४८० | ३५४ | ४९४ |
| (४) निवृत्ती वेतनविषयक खर्च | ३७६११०२२ | ४८८००७३३ | ४५०७६२९४ | ४६१९५०८८ |
| (५) दूरध्वनी वीज व पाणी शुल्क | २९३५ | ५२८८ | ४१४५ | ५२८४ |
| (६) कंत्राटी सेवा | १३१३२८ | १३७३७१ | १२४२६४ | १३७३७१ |
| (७) देशांतर्गत प्रवास खर्च | ११२७१ | २९०४८ | १८९१० | २९७४५ |
| (८) विदेश प्रवास खर्च | .. | ३२ | २२ | ३२ |
| (९) कार्यालयीन खर्च | ४१८००५ | २१३६१०९ | ११५५२८० | ३२०१६७४ |
| (१०) भाडे, पट्टी व कर | ४१४१ | ७५०० | ६००० | ७५०० |
| (११) संगणक खर्च | २२६०३ | २५१८८१ | ७१३१४ | २५१९३७ |
| (१२) इतर प्रशासकीय खर्च | ६०८२२ | ३५६२४३ | २८४३६४ | ३५६२३४ |
| (१३) पुरवठा व सामग्री | .. | .. | .. | .. |
| (१४) पेट्रोल, तेल व वंगण | ४०२५ | ६३८१ | ५१०४ | ७०१९ |
| (१५) जाहिरात व प्रसिद्धी | .. | ५००००० | ३५०००० | १००००० |
| (१६) लहान बांधकामे | ३५२९७३८६ | १५४८४२४० | १७९१३०३८ | १६४३५९५२ |
| (१७) व्यावसायिक सेवा | .. | १००० | ८०० | १००० |
| (१८) सहायक अनुदान (वेतनेतर) | ६८४०७५२० | ८६७५५९२७ | १३५६७५०९० | १२८४७२८९१ |
| (१९) अर्थसहाय्य | २३०५३६२८ | १३८१४३६६ | १८७९९६१६ | १९४१०००५ |
| (२०) सहाय्यक अनुदान (वेतन) | ३००१०९५३ | ३६७८६१९५ | ३३५८५६२७ | ४४४१६५३३ |
| (२१) व्याज | १०२६१६३५ | २८४८०७९३ | २३२३३२७३ | २०४४६७३३ |
| (२२) इतर खर्च | १४७८१६७९ | १३७३७२२४ | २८२९३७४६ | १३७३८१८६ |
| (२३) यंत्रसामुग्री व साधनसामुग्री | २७३०० | ५४६०० | ३८२२० | ६०००० |
| (२४) मोठी बांधकामे | ४२४०१८२३ | ७२७२६००९ | ६४५५७५९१ | ८३७७३८०० |
| (२५) कर्जे व आगाऊ रकमा | ६९६१७ | ६०१६० | २२१८२७ | १४०१६० |
| एकूण | **२६४३१७३८०** | **३२२४१८६११** | **३७१४९०४७९** | **३७९७७६३५५** |

## ६. ग्रामविकास विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना

## (अ) राज्य पुरस्कृत योजना-

**१. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रशासकीय व निवासी इमारतींच्या बांधकामासाठी सहाय्यक अनुदान (लेखाशिर्ष २५१५ ००५३ व २५१५ १२५६) :--(बांधकाम ४)**

७३ व्या घटनात्मक दुरुस्तीन्वये पंचायत राज संस्थांचे बळकटीकरण करावयाचे आहे. दारिद्रय निर्मुलनाच्या व विकासाच्या अनेक शासकीय योजनांच्या यशस्वीरित्या अंमलबजावणीमध्ये पंचायत राज संस्थांचे आता मोठे योगदान राहणार आहे. त्यासाठी पंचायत समिती प्रशासकीय कार्यालय सुव्यवस्थेत असणे अगत्याचे आहे. यासाठी नवनिर्मित जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या प्रशासकीय व निवासी इमारतीच्या बांधकामाचा संपूर्ण खर्च राज्य शासनामार्फत केला जातो. सदर योजनेखाली प्रशासकीय व निवासी इमारत बांधकामाकरिता मागणीप्रमाणे/आवश्यकतेनुसार निधी अनुदानाच्या स्वरुपात सदर स्थानिक स्वराज्य संस्थांना उपलब्ध करून दिला जातो.

माहे डिसेंबर, २०२४ अखेर प्रशासकीय इमारत बांधकामावरील दायित्व रु. ७२६.९७ कोटी व निवासी इमारत बांधकामावरील दायित्व रु. १९२.५५ कोटी इतके आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा परिषद/पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारत बांधकामाकरीता रु. १३०.०० कोटी व निवासी इमारत बांधकामासाठी रु. २५.०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी माहे डिसेंबर, २०२४ अखेर जिल्हा परिषद/पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारत बांधकामाकरीता मंजूर तरतुदीच्या ४५ टक्केच्या मर्यादेत व जिल्हा परिषद/पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारत बांधकामाकरीता मंजूर तरतुदीच्या ६० टक्केच्या मर्यादेत वित्त विभागामार्फत सदर लेखाशीर्षांतर्गत खर्च भागविण्यासाठी निधी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**२. ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र व लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था केंद्रे :-- (योजना ११)**

केंद्र शासनाने १ फेब्रुवारी, १९९९ पासून एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, ट्रायसेम, ड्वाका, सिट्रा, दशलक्ष विहीर योजना व गंगा कल्याण योजना या ६ योजना एकत्रित करून नव्याने स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना सुरू केली आहे. ट्रायसेम ही योजना स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेत एकत्रित केल्यामुळे केंद्र शासनाकडून मिळणारा ५०% हिस्सा सदर योजनेसाठी बंद केला आहे व सदर योजना पुढे स्वतंत्ररित्या चालू होणार नाही, असे केंद्र शासनाने कळविल्यामुळे ट्रायसेम योजने अंतर्गत सुरु करण्यात आलेल्या मूलभूत सुविधा विनावापर वाया जावू नये म्हणून राज्यातील ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र व लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था केंद्र व त्यामध्ये स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण यासाठी ७५ ते ९० टक्के राज्य शासनाच्या निधीतून व जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाच्या वर्गवारीनुसार उपलब्ध होणाऱ्या एकूण उत्पन्नापैकी १० ते २५ टक्के निधीतून सुरू ठेवण्याबाबत दिनांक ८ डिसेंबर, १९९९ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने शासन निर्णय, क्र. ग्रायुप्र-१०९९/प्र.क्र. ६४३/४१, दिनांक ८ फेब्रुवारी, २००० अन्वये ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र व लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था केंद्र सुरू करणेबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर योजना ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत सुरू आहे. राज्यात एकूण ३० ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र व २९ लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यास मान्यता दिलेली असून सद्य:स्थितीत अहमदनगर, यवतमाळ, वर्धा, सांगली, कोल्हापूर, चंद्रपूर, जळगांव, भंडारा, अमरावती, रत्नागिरी, सातारा व गोंदिया अशा १२ जिल्ह्यात ७ ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र व ११ लघु औद्योगिक प्रशिक्षण केंद्र संस्था सुरू आहेत.

ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र व लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था केंद्रातगट निदेशक, निदेशक लिपिक, शिपाई या पदांवर कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाते वगट निदेशक, निदेशक हे कर्मचारी तांत्रिक स्वरुपाचे असून ते नळकारागिर, रेडिओ/टीव्ही दुरुस्ती, वेल्डर, प्लंबर, वायरमन, मोटर रिव्हायडींग पंप मेकॅनिक, सुतारकाम, फिटर, टुव्हिलर दुरुस्तीसाठी इ. व्यवसायाशी (ट्रेड) निगडीत आहे. अशा कोणत्याही ४ व्यवसायांचे ६ महिन्यांपर्यंत प्रशिक्षण देण्यात येते. सदर कर्मचारी नियमित वेतनावरील नसून त्यांना ठराविक असे मानधन देण्यात येते.

ट्रायसेम प्रशिक्षण केंद्रातील १ व्यवसायासाठी १५ याप्रमाणे कोणत्याही ४ व्यवसायांचे प्रशिक्षण घेण्यासाठी ६० प्रशिक्षणार्थ्यांची मर्यादा विहित केली आहे. तर लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था केंद्रातील १ व्यवसायाकरिता २० याप्रमाणे ४ व्यवसायासाठी ८० प्रशिक्षणार्थ्यांची मर्यादा विहित केलेली आहे.

या योजनेसाठी कंत्राटी पध्दतीने नेमण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मानधन खालीलप्रमाणे आहे :--

| **अ.क्र.** | **पदनाम** | **मानधन** | |
|---|---|---|---|
| | | **ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र** | **मीनी आयटीआय प्रशिक्षण केंद्र** |
| १ | गट निदेशक | ६५०० | ६५०० |
| २ | निदेशक | ५५०० | ५५०० |
| ३ | लिपिक | ४००० | ४००० |
| ४ | वर्ग-४ चे कर्मचारी (शिपाई, मदतनीस, सफाई कामगार) | ३००० | ३००० |
| | **एकूण** | **१९०००** | **१९०००** |

ट्रायसेम प्रशिक्षण केंद्रे व लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था केंद्रे ही योजना नियोजन विभागाने जिल्हास्तरीय योजना म्हणून राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या योजनेसाठी लागणारा निधी नियोजन विभागामार्फत अर्थसंकल्पीत करण्यात येतो. (तथापि, सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.)

**३. यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियान :-- (पंरा १)**

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे योगदान मोठे आहे राज्यामधील विकासाच्या प्रमुख योजना पंचायत राज संस्थामार्फत राबविल्या जातात. त्यामुळे पंचायत राज संस्थांना त्यांनी केलेल्या कामगिरीनुसार प्रोत्साहित करून त्यांची कार्यक्षमता अधिक वाढविणे व त्यांच्यामध्ये उत्कृष्ट कामांची स्पर्धा निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी राज्यात पंचायत राज संस्थांचे व्यवस्थापन व विकास कार्यात अत्युत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांना व ग्रामपंचायतींसाठी सन २००५-०६ या आर्थिक वर्षापासून विभागस्तरावर व राज्यस्तरावर "यशवंत पंचायत राज अभियान" ही पुरस्कार योजना सुरू करण्यात आली आहे. [राज्यातील ग्रामपंचायतींसाठी "स्मार्ट ग्राम व्हिलेज" ही योजना नव्याने राबविण्यात येत असल्याने "यशवंत पंचायत राज अभियान" या योजनेमध्ये ग्रामपंचायती समाविष्ट न करण्याचा निर्णय शासनाने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून घेतला आहे.]

या पुरस्कारासाठी मागील तीन वर्षातील केलेली तरतूद त्यावरील झालेला खर्च खालीलप्रमाणे आहे. तथापि राज्यातील कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर सन २०१९-२० व सन २०२०-२१ या वर्षातील यशवंत पंचायत राज अभियान पुरस्कार कार्यक्रम आयोजन करण्यात आलेले नाहीत.

| **अ.क्र.** | **वर्ष** | **अर्थसंकल्पीय तरतूद (रु. लाखात)** | **झालेला खर्च (रु. लाखात)** |
|---|---|---|---|
| १ | सन २०२०-२१ | १.७३८ | .. |
| २ | सन २०२१-२२ | ३.८२ | .. |
| ३ | सन २०२२-२३ | ११४७.०८ | ५९२.०० |
| ४. | सन २०२३-२४ | ४२०.०० | .. |

**टिप :** सन २०२०-२१ व सन २०२२.२३ च्या कार्यक्रमासाठी सन २०२२-२३ मध्ये रक्कम रु.११४७.०८ लक्ष अर्थसंकल्पीत करण्यात आली असून खर्च रु. ५९२.०० लक्ष झालेला आहे. सन २०२३-२४ मध्ये लोकसभा निवडणूकीमुळे सदर कार्यक्रम होऊ शकला नाही. यास्तव सन २०२३-२४ मध्ये खर्च झालेला नाही.

**राष्ट्रीय पंचायत पुरस्कार: (पंडीत दिनदयाळ उपाध्याय पंचायत सशक्तीकरण पुरस्कार)**

सन २०१५-१६ या वर्षापासून ही योजना Online करण्यात आली व ती "पंडीत दिनदयाळ उपाध्याय पंचायत सशक्तीकरण पुरस्कार" या नावाने ओळखली जाऊ लागली. सन २०२३ मध्ये या योजनेचे नाव राष्ट्रीय पंचायत पुरस्कार असे करण्यात आले असून योजनेमध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात आले. राष्ट्रीय पंचायत पुरस्कार ही पंचायती राज संस्थांची (PRIs) पंचायत समिती, जिल्हा परिषद, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील ९ थीम (पंचायती राज मंत्रालयाच्या तज्ञ समितीद्वारे ओळखली जाणारी) बहु-स्तरीय पिरॅमिड स्पर्धा असेल. शाश्वत विकास उद्दिष्टांचे ९ स्थानिकीकरण (LSDG) थीम आहेत (१) गरीबी मुक्त आणि उपजिविका (रोजगार) वृद्धीस पोषक गाव (२) आरोग्य दायी गाव (३) बालस्नेही गाव (४) जलसमृद्ध गाव (५) स्वच्छ व हरित गाव (६) स्वयंपूर्ण पायाभूत सुविधा युक्त गाव (७) सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव (८) सुशासन युक्त गाव (९) लिंग समभाव पोषक गाव पंचायतींना या थीम अंतर्गत SDGs प्राप्त करण्यासाठी त्यांच्या कामगिरीसाठी प्रोत्साहन दिले जाते.

**अधिकारांचे पंचायत राज संस्थाकडे विकेंद्रीकरण :--** दिनांक २० एप्रिल, १९९३ रोजी झालेल्या ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार भारतीय राज्य घटनेमध्ये भाग ९ अंतर्भूत करण्यात आला आहे. तसेच त्यातील अनुच्छेद २४३ जी अन्वये राज्याचे विधिमंडळ कायदे करून स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार प्रदान करत असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वयंपूर्ण होण्याच्यादृष्टीने अधिकारांचे पंचायत राज संस्थांकडे विकेंद्रीकरण करण्यासाठी घटनेतील अनुसूची ११ मधील २९ विषय पंचायत राज संस्थांकडे हस्तांतरित करावयाचे आहेत. त्यानुसार राज्य शासनाने निरनिराळ्या विभागाकडील आजपर्यंत २९ विषयांपैकी १४ विषय व संबंधित योजना कर्मचाऱ्यांसह जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केल्या आहेत.

**४. ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम :--** (योजना-६)

**योजना सुरू झाल्याचा दिनांक--**शासन निर्णय क्र. व्हीपीएम-१०९६/२२०/२२, दिनांक २८ ऑक्टोबर, ११९७ अन्वये योजना सुरू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णय अधिक्रमित करून योजनेच्या सुधारित तरतुदी शासन निर्णय क्र. तीर्थवि-२०११/प्र.क्र.६५१/योजना ७, दि. १६ नोव्हेंबर, २०१२ अन्वये विहित करण्यात आल्या आहेत.

**योजनेचा मूळ विभाग :--**ग्रामविकास विभाग

**योजनेचे स्वरूप :--** १) ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी दिवसेंदिवस देवदर्शनासाठी भाविक/यात्रेकरुंची संख्या मोठ्या प्रमाणात सातत्याने वाढत आहे. अशा ठिकाणी भाविक/यात्रेकरू यांना विविध सोयी-सुविधा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना (उदा. ग्रामपंचायत) त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नामुळे पुरविणे शक्य होत नाही. म्हणून शासनाने ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देण्याची योजना सुरू केली. या योजनेंतर्गत गावातील तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मंदिरापर्यंत पोहोच रस्ते, पाणी पुरवठ्याची व्यवस्था करणे, स्वच्छतागृह, शौचालय, वाहनतळ, भक्तनिवास, पोहोच रस्त्यावरील दिवे आणि संरक्षक भिंत इत्यादी सुविधा निर्माण केल्या जातात.

२) ग्रामीण तीर्थक्षेत्रांची वर्गवारी "अ", "ब" व "क" या तीन प्रकारात करण्यात आली आहे. "अ" वर्गातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय किर्तीची स्थळे जी केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्यातून विकसित करण्यात येतात. "ब" वर्गातील तीर्थक्षेत्रे जी राज्यस्तरावरील तरतुदीतून विकसित करण्यात येतात. तीर्थक्षेत्रांना "ब" वर्ग दर्जा देण्यासाठी व निधीची शिफारस करण्यासाठी प्रधान सचिव (ग्रामविकास) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. राज्यस्तरावरून एका तिर्थक्षेत्रास रु. २.०० कोटी एवढ्या निधीच्या मर्यादेत विकास कामांसाठी निधी वितरित केला जातो.

३) तीर्थक्षेत्रास "ब" वर्ग दर्जा देण्यासाठी, तीर्थक्षेत्रास "क" वर्ग दर्जा असल्याचा पुरावा व तिर्थक्षेत्रास भेट देणाऱ्या भाविकांची संख्या ४ लाख असल्याचे जिल्हा पोलीस अधिक्षकांचे प्रमाणपत्र, जागेचा ७/१२ उतारा, जागा हस्तांतरणाचे संमतीपत्र, जागा वनक्षेत्रात येत नसल्याचे प्रमाणपत्र, देखभाल-दुरुस्ती प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांसह विहीत प्रपत्रात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत शासनास प्रस्ताव सादर करावा लागतो. सदर प्रस्तावावर राज्य निकष समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही केली जाते.

४) "क" वर्गातील तीर्थक्षेत्रे जी स्थानिक पातळीवर प्रसिध्द असून, सदर तीर्थक्षेत्रांस जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन व विकास समिती "क" वर्ग दर्जा व निधी मंजूर करते. सदर निधी नियोजन विभागामार्फत जिल्हा योजने अंतर्गत जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन दिला जातो.

ग्रामीण भागातील तार्थक्षेत्राच्या विकासाकरिता रु. २.०० कोटी ते २५.०० कोटी पर्यंत अनुदान या (लेखाशिर्ष २५१५२५२१) (मोठे आराखडे) खाली देण्यात येते.

५) नियोजन विभाग, शासन निर्णय दिनांक ४ जून, २०१५ अन्वये ग्रामीण भागातील मोठ्या तिर्थक्षेत्रांचे आराखडे ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात येत आहेत. सदर शासन निर्णयान्वये तिर्थक्षेत्रांचे आराखडा तयार करण्याकरिता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती व आराखड्याच्या नियोजनाकरिता पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीच्या मान्यतेने तिर्थक्षेत्राचा आराखडा शासनास सादर केला जातो. तद्नंतर सदर आराखडा मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती व मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली शिखर समितीसमोर मान्यतेसाठी सादर केला जातो. सदर समित्यांच्या मान्यतेनंतर प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्धतेनुसार निधीचे वितरण करण्यात येते.

**योजनेसाठी केलेली अर्थसंकल्पीय तरतूद व खर्च :--**

१) सन २०२१-२२ साठी-- १) छोटे आराखडे- तरतूद रु. १००.०० कोटी, प्रत्यक्ष प्राप्त तरतूद रु. ५०.०० कोटी
प्रत्यक्ष खर्च- रु. ४४.०४ कोटी
२) मोठे आराखडे- तरतूद रु. २००.०० कोटी
प्रत्यक्ष खर्च- रु. ३.७५ कोटी

२) सन २०२२-२३ साठी-- १) छोटे आराखडे- तरतूद रु. १५०.०० कोटी
प्रत्यक्ष खर्च- रु. २२.१७ कोटी
२) मोठे आराखडे- तरतूद रु. २२५.०० कोटी
प्रत्यक्ष खर्च- रु. ७९.०६ कोटी

३) सन २०२३-२४ साठी-- १) छोटे आराखडे- तरतूद रु. १५०.०० कोटी,
प्रत्यक्ष प्राप्त तरतूद रु. ३०.०० कोटी
प्रत्यक्ष खर्च- २.१३ कोटी
२) मोठे आराखडे- तरतूद रु. २४०.०० कोटी,
प्रत्यक्ष प्राप्त तरतूद रु. ४८.०० कोटी
प्रत्यक्ष खर्च- रु. २४.९० कोटी

**५. मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते, गटारे व अन्य मुलभूत सुविधा पुरविणे (२५१५१२३८):--**

**राज्य पुरस्कृत योजना --**

**योजना सुरू झाल्याचा दिनांक--** शासन निर्णय क्र. विकास २००९/प्र.क्र. १९३/पं.रा. ८ दिनांक २४ फेब्रुवारी, २००९ अन्वये सदर योजना सुरू करण्यात आली आहे.

**योजनेचा मूळ विभाग :--**ग्रामविकास विभाग

**योजना ग्रामविकास विभागाकडे हस्तांतरित केल्याचा दिनांक--** निरंक.

**योजनेचे स्वरूप :-- ग्रामीण भागातील विकासकामांसाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदान (लेखाशीर्ष २५१५-१२३८)**

राज्यातील गावांतर्गत मूलभूत सुविधांच्या विकास कामांना पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्याने ग्रामस्थांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. यासाठी लोकप्रतिनिधींकडून मुलभूत सुविधांसाठी निधीची मागणी होत असते. ही बाब विचारात घेऊन शासनाने लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा पुरविणे ही योजना सन २००८-०९ पासून सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या निकष व कार्यपद्धती संदर्भात वेळोवेळी आदेश निर्गमित

करण्यात आलेले आहेत. सदर योजना जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यात येत होती. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या मुलभूत सुविधांच्या कामासंदर्भात संभ्रमावस्था राहू नये व या योजनेंतर्गत अवलंबिण्यात येणाऱ्या कार्यप्रणालीमध्ये अधिक सुस्पष्टता व सुसूत्रता यावी म्हणून लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेंतर्गत अर्ज कोणत्या प्राधिकरणाकडे करणे, निवडायची कामे, तपासणी इत्यादी. यासंदर्भातील यापूर्वीचे सर्व आदेश अधिक्रमित करून शासन निर्णय क्र. विकास २०१५/प्र.क्र. ५२/यो-६ दि. २७-३-२०१५ अन्वये खालीलप्रमाणे सुधारित कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे.

**अ) अर्ज करावयाचे प्राधिकारी व लोक प्रतिनिधी :--**

लोकप्रतिनिधींकडून म्हणजेच अ) खासदार ब) आमदार क) जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीचे सदस्य यांनी त्यांच्या भागातून सुचविलेल्या कामांचे प्रस्ताव ग्रामविकास विभागास थेट सादर करावेत.

**ब) योजनेंतर्गत घ्यावयाची कामे :--**

गावांतर्गत रस्ते, गटारे, पाऊसपाणी निचरा (Storm Water Drainage) दहन व दफन भूमीची सुधारणा करणे, संरक्षक भिंत, ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम करणे, आठवडी बाजारासाठी सुविधा, गावामध्ये कचरा डेपोसाठी व प्राथमिक प्रक्रियेसाठी सुविधा, सार्वजनिक जागेत वृक्ष लागवड व त्यांचे संरक्षण, सामाजिक सभागृह/समाज मंदिर, सार्वजनिक शौचालय, रस्त्यावर पेव्हिंग ब्लॉक बसविणे, व्यायामशाळा/आखाडा बांधकाम करणे, प्रवासी निवारा शेड, वाचनालय बांधकाम करणे, नदीघाट बांधकाम करणे, बगीचे सुशोभिकरण व पथदिवे, बगीचे, चौकाचे सुशोभिकरण व अन्य मुलभूत बाबी.

**दि. १६-१२-२०१५ रोजीच्या आदेशान्वये समाविष्ट झालेली कामे :--**

१) अंगणवाडी नूतनीकरण सुशोभिकरण व डिजीटल अंगणवाडी/बळकटीकरण (च्या मर्यादेत रु. ५०,०००/-) करणे.

२) सौरऊर्जा पंपासह पाणीपुरवठा योजना (१ ते १० एच.पी. पर्यंत) घेणे.

३) घनकचरा विल्हेवाट लावण्यासाठी संयंत्राचा वापर करून घनकचरा व्यवस्थापन करणे.

४) प्रिफॅब्रिकेटेड (Prefabricated) अंगणवाडी ग्रामपंचायत कार्यालय/सामाजिक सभागृहाचे/सार्वजनिक वाचनालय/ग्रामपंचायत कार्यालय/बांधकाम करणे.

५) शुद्ध पिण्याचे पाणीपुरवठा करण्यासाठी पाणी शुद्धीकरण संयंत्र (RO) प्रणाली बसविणे व देखभाल दुरूस्ती.

**दि. २२-१०-२०१८ रोजीच्या आदेशान्वये नव्याने समाविष्ट झालेली कामे :--**

१) जिल्हा परिषदांच्या शाळांचे नूतनीकरण.

२) जिल्हा परिषदांच्या शाळांची तसेच अंगणवाड्यांची विशेषत: पडीक व मोडकळीस आलेल्या वर्ग खोल्या इ. दुरुस्ती.

३) अंगणवाडी व जिल्हा परिषदांच्या शाळांच्या ठिकाणी शुध्द पिण्याचे पाणीपुरवठा करण्यासाठी पाणी शुद्धीकरण संयंत्र (RO) बसविणे.

**दि. १-२-२०१९ रोजीच्या आदेशान्वये नव्याने समाविष्ट झालेली कामे :--**

१. अभ्यासिका बांधकाम करणे.

२. अभ्यासिकेसाठी ऑफग्रीड सौर सिस्टीम बसविणे.

३. वयोवृद्धासाठी (ज्येष्ठ नागरिकांसाठी) पार्क तयार करणे.

४. सार्वजनिक ठिकाणी सी.सी.टी.व्ही. बसविणे.

५. महिला ग्रामसंघ इमारत बांधकाम करणे.

**दि. ८-३-२०१९ रोजीच्या शुद्धीपत्रकान्वये नव्याने समाविष्ट झालेली कामे :--**

१. अभ्यासिकेच्या ठिकाणी ऑफग्रीड सौर सिस्टीम बसविणे व सी.सी.टी.व्ही. बसविणे.

२. खुल्या व्यायामशाळेस साहित्य पुरविणे.

**दि. २५-७-२०१९ रोजीच्या आदेशान्वये नव्याने समाविष्ट झालेली कामे :--**

तसेच, विभागाच्या दि. २५ जुलै, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजनेत पालकमंत्री शेत/पाणंद रस्ते योजनेतील कामांचा समावेश करण्यात आला आहे. एखादा शेत/पाणंद अतिक्रमविरहित करून कच्चा रस्ता तयार झाल्यानंतर त्याचे मजबुतीकरण किंवा पक्का करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेंतर्गत (२५१५ १२३८) निधी उपलब्ध करून देण्यात येईल व उपरोक्त कामे ही पालकमंत्री शेत/पाणंद रस्ता योजनेच्या कार्यपद्धतीप्रमाणे करण्यात येईल.

**मात्र सदर निधी देताना खालील अटी/शर्तीची पूर्तता करणे आवश्यक आहे--**

१) सदर कामास मंजुरी देताना संबंधित शासननियुक्त कार्यान्वित यंत्रणा यांनी खात्री करावी की, सदरच्या कामासाठी नियोजन विभागाच्या वरील नमूद शासन निर्णयामधील नमूद अन्य इतर स्त्रोतांमधून निधी उपलब्ध झालेला नाही, याची दक्षता/खात्री करूनच पुढील कार्यवाही करावी. जेणेकरून योजनेची व खर्चाची द्विरूक्ती होणार नाही.

२) सदर रस्ता अतिक्रमणमुक्त असणे आवश्यक आहे.

३) उपरोक्त रस्त्यांच्या कामाप्रकरणी संबंधित शासननियुक्त कार्यान्वित यंत्रणा (जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभाग) यांनी शासन मान्यतेनंतर योग्य तो प्रस्ताव तयार करून पुढील कार्यवाही नियमानुसार करावी व कोणत्याही प्रकारची अनियमितता/अपहार होणार नाही याची पूर्णपणे दक्षता घ्यावी व शासनास अवगत करावे.

या निधीतून योग्यप्रकारे कामे होण्याच्यादृष्टीने दरवर्षी कोणत्या कामांना प्राथम्य द्यावे त्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात येईल.

**दि. १७/०२/२०२० रोजीच्या आदेशान्वये नव्याने समाविष्ट झालेली कामे :--**

गावामध्ये सौर ऊर्जा/विद्युत उर्जेवर आधारित पोलसहित विद्युत रोहित्र (डी.पी.) बसविणे.

**क) कामे निवडण्याचे अधिकार :--**

लोकप्रतिनिधींनी सुचविलेली कामे निवडण्यासंदर्भाचे सर्व अधिकार हे शासनास राहतील.

**ड) अंमलबजावणी यंत्रणा :--**

ही कामे संबंधित लोकप्रतिनिधी ज्या कार्यान्वयन यंत्रणेकडून सुचवतील म्हणजेच ग्रामपंचायत, जिल्हा परिषद किंवा शासनाचे अन्य विभाग यापैकी कोणत्या यंत्रणेमार्फत करण्यात यावीत याबाबत शासनस्तरावर निर्णय घेण्यात येईल आणि तो अंतिम असेल.

**इ) उपयोगिता प्रमाणपत्र :--**

ज्या कार्यान्वयन यंत्रणेस काम देण्यात येईल त्याची अंमलबजावणी करणे व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी ही त्या यंत्रणेची राहील.

**२.** शासन स्तरावर मंजूर झालेल्या कामांमध्ये अपवादात्मक परिस्थितीत बदल करण्याचे अधिकार ग्रामविकास विभागास असतील.

**३.१** सदर योजने अंतर्गत मंजूर झालेली कामे ग्रामपंचायतीमार्फत करावयाचा शासनाने निर्णय घेतल्यास सदर कामे शासन निर्णय, ग्रामविकास विभाग क्रमांक-झेडपीए-२०१५/प्र.क्र. १०/वित्त-९, दि. २५ मार्च, २०१५ मध्ये नमूद केल्यानुसार त्यातील सूचना व कार्यपध्दतीनुसार तसेच ग्रामपंचायतीची कामे करण्याची आर्थिक मर्यादा ज्या-ज्या वेळी सुधारित करण्यात येईल त्या सुधारित मर्यादेनुसार ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येतील.

**३.२** ग्रामपंचायतीस यंत्रणा म्हणून विकास कामे दिल्यावर शासन स्तरावरून मंजुरी दिलेल्या कामांच्या संदर्भातला निधी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे वितरित करण्यात येईल.

ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येणाऱ्या कामांचा दर्जा व गुणवत्ता हे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मानकांप्रमाणे असावीत, ती तशी नसल्यास ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक व कंत्राटदार/संबंधित यंत्रणा यांना सामूहिक व वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल.

**४.** अन्य यंत्रणेमार्फत कामे करताना त्या यंत्रणेला थेट निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच त्या यंत्रणेच्या नियम व प्रचलित कार्यपध्दतीचे पालन करुन त्या यंत्रणेने काम करणे बंधनकारक राहील.

**योजनेसाठी केलेली अर्थसंकल्पीय तरतूद व खर्च :--**

१) सन २०२२-२३ साठीची मंजूर तरतूद : रु. २०००.०० कोटी
प्रत्यक्ष प्राप्त तरतूद : रु. २०००.०० कोटी, प्रत्यक्ष खर्च रु. १९९९.९९ कोटी

२) सन २०२३-२४ साठीची मंजूर तरतूद : रु. २५१७.७५०३ कोटी
प्रत्यक्ष प्राप्त तरतूद : रु. २५१७.७५०३ कोटी, प्रत्यक्ष खर्च रु. २५१७.७५०३ कोटी

३) सन २०२४-२५ साठीची मंजूर तरतूद : रु. १७०० कोटी
प्रत्यक्ष प्राप्त तरतूद : रु. ३०.०० कोटी, प्रत्यक्ष खर्च : निरंक

**६. प्रशिक्षण योजना :--(आस्था १५)**

**योजनेचा मूळ विभाग :--**ग्रामविकास विभाग

ग्रामविकास विभागामार्फत कार्यरत असलेली २१ प्रशिक्षण केंद्रे

**i) राज्यात खालीलप्रमाणे सहा शासकीय प्रशिक्षण केंद्रे व तीन अशासकीय ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रे कार्यरत आहेत--**

**अ) शासकीय ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रे**

१. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, परभणी, जिल्हा परभणी
२. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, जालना, जिल्हा जालना
३. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, सिंदेवाही, जिल्हा चंद्रपूर
४. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, मांजरी फार्म, जिल्हा पुणे
५. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, कसबा बावडा, जिल्हा कोल्हापूर
६. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, बुलढाणा, जि. बुलढाणा

**ब) अशासकीय ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रे**

१. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, गारगोटी, जिल्हा कोल्हापूर
२. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, कोसबाड हिल, जिल्हा पालघर
३. ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, अमरावती, जिल्हा अमरावती

या केंद्रांमार्फत राज्यातील ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी इत्यादींना सेवांतर्गत प्रशिक्षण देण्यात येते. या सर्व ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रांना वेतन व वेतनेतर बाबींसाठी राज्य शासनाकडून दरवर्षी १०० टक्के अनुदान मंजूर करण्यात येते.

सन २०२४-२५ या वित्तीय वर्षामध्ये सहा शासकीय ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रांच्या वेतनेतरसाठी रु. ८४.२३४२ लक्ष (रु. चौऱ्याऐंशी लक्ष तेवीस हजार चारशे वीस फक्त) व वेतनासाठी रु. ७२३.६९ लक्ष (रु. सात कोटी, तेवीस लक्ष एकोणसत्तर हजार फक्त) अशी एकूण रु. ८०७.९२४२ लक्ष (रु. आठ कोटी सात लक्ष ब्याण्णव हजार चारशे वीस फक्त) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

सन २०२५-२६ या वित्तीय वर्षासाठी सहा शासकीय ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रांना वेतनेतरसाठी रु. ६४.८५ लक्ष (रुपये चौसष्ट लक्ष पंचाऐंशी हजार फक्त) व वेतनासाठी रु. ७८३.४९९२ (रुपये सात कोटी त्र्याऐंशी लक्ष एकोणपन्नास हजार फक्त) अशी एकूण रु. ८४८.३४९२ लक्ष (रुपये आठ कोटी अठ्ठेचाळीस लक्ष चौतीस हजार नऊशे वीस फक्त) इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

सन २०२४-२५ या वित्तीय वर्षामध्ये तीन अशासकीय ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रांना वेतनासाठी व वेतनेतरासाठी खालीलप्रमाणे तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

(रक्कम रुपये लाखात)

| अ.क्र. | प्रशिक्षण केंद्राचे नाव | सन २०२४-२५ साठी अर्थसंकल्पित तरतूद | | | सन २०२५-२६ साठी प्रस्तावित तरतूद | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वेतन | वेतनेतर | एकूण | वेतन | वेतनेतर | एकूण |
| १ | ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, गारगोटी, जिल्हा कोल्हापूर २४१५०३२१ | १९७.४२९४ | ८.९१ | २०६.३३९४ | १७३.९२ | १५.०० | १८८.९२ |
| २ | ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, कोसबाड हिल, जिल्हा पालघर २४१५०३१२ | ८९.८६ | ८.९० | ९८.७६ | ४४.५० | १०.०० | ५४.५० |
| ३ | ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, अमरावती, जिल्हा अमरावती २४१५०३३९ | ९२.६२ | १०.०० | १०२.६२ | ६८.०० | १०.०० | ७८.०० |
| | **एकूण** | **३७९.९०९४** | **२७.८१** | **४०७.७१९४** | **२८६.४२** | **३५.००** | **३२१.४२** |

**ii) राज्यात खालीलप्रमाणे ११ पंचायत राज प्रशिक्षण केंद्रे कार्यरत आहेत**

१. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, वर्ये, जिल्हा सातारा
२. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, मुरुड, जिल्हा लातूर
३. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, खामगांव, जिल्हा बुलढाणा
४. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, अमरावती, जिल्हा अमरावती
५. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र,गारगोटी, जिल्हा कोल्हापूर
६. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, पुसद, जिल्हा यवतमाळ
७. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र,गौंडगांव, जिल्हा सोलापूर
८. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, हनुमाननगर, जिल्हा नागपूर
९. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, कोसबाड हिल, जिल्हा ठाणे
१०. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, खिरोंदा, जिल्हा जळगांव
११. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, मूल, जिल्हा चंद्रपूर

या प्रशिक्षण केंद्रांमार्फत ग्रामपंचायतीचे सरपंच, उप सरपंच, ग्रामपंचायत सदस्य इत्यादीना त्यांचे दैनंदिन कर्तव्य कार्यक्षमतेने पार पाडता यावे तसेच त्यांची क्षमता बांधणी व्हावी या उद्देशाने प्रशिक्षण दिले जाते. या सर्व केंद्रांना वेतन व वेतनेतर बाबींसाठी राज्य शासनाकडून दरवर्षी १०० टक्के अनुदान मंजूर करण्यात येते.

सन २०२४-२५ या वित्तीय वर्षामध्ये वेतनासाठी रु. ५६७.७७ लक्ष (रु. पाच कोटी सदुसष्ट लक्ष सत्त्याहत्तर हजार फक्त) व वेतनेतरसाठी रु. ६५.१६ लक्ष (रु. पासष्ट लक्ष सोळा हजार फक्त) असे एकूण रु. ६३२.९३ लक्ष (रुपये सहा कोटी बत्तीस लक्ष त्र्याण्णव हजार फक्त) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता वेतनासाठी रु. ५११.५८२० लक्ष (रु. पाच कोटी अकरा लक्ष अठ्ठावन्न हजार दोनशे फक्त) व वेतनेतरसाठी रु. ११४.६१७० लक्ष (रुपये एक कोटी चौदा लक्ष एकसष्ट हजार सातशे फक्त) अशी एकूण रु. ६२६.१९९ लक्ष (रुपये सहा कोटी सव्वीस लक्ष एकोणीस हजार नऊशे फक्त) इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**iii) संयुक्त प्रशिक्षण केंद्र, गारगोटी, जिल्हा कोल्हापूर**

पंचायत राज संस्थेतील संबंधित विस्तार अधिकारी/कक्ष अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे दैनंदिन कर्तव्य योग्यरितीने सक्षमपणे पार पाडण्याच्या उद्देशाने या प्रशिक्षण केंद्रांमार्फत प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण केंद्र मौनी विद्यापीठ, गारगोटी, जिल्हा कोल्हापूर या खाजगी संस्थेकडून चालविले जात असून सदर केंद्रांसाठी वेतन व वेतनेतर बाबींसाठी राज्य शासनाकडून दरवर्षी १०० टक्के अनुदान मंजूर करण्यात येते.

सन २०२४-२५ या वित्तीय वर्षामध्ये वेतनसाठी रु. १०६.३९ लक्ष (रुपये एक कोटी सहा लक्ष एकोणचाळीस हजार फक्त) व वेतनेतरसाठी रु. ९.४१ लक्ष (रुपये नऊ लक्ष, एक्केचाळीस हजार फक्त) असे एकूण रु. ११५.८० लक्ष (रुपये एक कोटी पंधरा लक्ष ऐंशी हजार फक्त) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता वेतनासाठी रु. १४५.१० लक्ष (रु. एक कोटी पंचेचाळीस लक्ष दहा हजार फक्त) व वेतनेतरसाठी रु. ३७.०० लक्ष (रुपये सदोतीस लक्ष फक्त) अशी एकूण रु. १८२.१० लक्ष (रुपये एक कोटी ब्याऐंशी लक्ष दहा हजार फक्त) इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**४) यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी यशदा, पुणे**

ग्रामविकास विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समिती व इतर कार्यालयातील कर्मचारी/ अधिकारी यांना नियमित प्रशिक्षण यशदा, पुणे यांच्याकडून देण्यात येत आहे.

सन २०२४-२५ या वित्तीय वर्षामध्ये वेतनेतरसाठी एकूण रु. २००.०० लक्ष (रु. दोन कोटी फक्त) इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

सन २०२५-२६ या वित्तीय वर्षासाठी वेतनेतरसाठी एकूण रु. ५००.०० लक्ष (रु. पाच कोटी फक्त) इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**५) राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान :-**

केंद्र शासनाने पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी केंद्र शासनाच्या **"राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान"** या योजनेचे पुनर्गठन करून **"राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान"** ही योजना सन २०१८-१९ पासून लागू केली आहे. सदर योजना केंद्र शासन पुरस्कृत असून या योजनेची महाराष्ट्र राज्यात सन २०१८-१९ ते २०२१-२२ या कालावधीकरिता लागू केली आहे. तद्नंतर सदर योजनेचे रुपांतर केंद्र शासनाने "पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान" या योजनेमध्ये केले असून सदर योजनेचा कालावधी सन २०२२-२३ ते सन २०२५-२६ केलेला आहे. याबाबत दिनांक १६ सप्टेंबर, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून त्यानुसार सदर योजना राबविण्यात येत आहे. या योजनेकरिता सन २०२४-२५ व सन २०२५-२६ करिता खालीलप्रमाणे निधी अर्थसंकल्पित तरतूद करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

| **अ. क्र.** | **योजनेचे नाव** | | **सन २०२४-२५ साठी अर्थसंकल्पित तरतूद वेतनेतर** | **सन २०२५-२६ साठी प्रस्तावित तरतूद वेतनेतर** |
|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान (सर्वसाधारण घटक) | केंद्र हिस्सा ६०% | १७९६५.११ | १९७६१.६२ |
| | | राज्य हिस्सा ४०% | ११९७६.७४ | १३१७४.४२ |
| | | **एकूण** | **२९९४१.८५** | **३२९३६.०४** |
| २ | पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान (आदिवासी घटक) | केंद्र हिस्सा ६०% | २१३०.५७ | २३४३.६२ |
| | | राज्य हिस्सा ४०% | १४२०.३८ | १५६२.४१ |
| | | **एकूण** | **३५५०.९५** | **३९०६.०३** |
| ३ | पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान (अनुसूचित जाती घटक) | केंद्र हिस्सा ६०% | २८२२.२१ | २९६०.२३ |
| | | राज्य हिस्सा ४०% | १८८१.४७ | १९७३.४९ |
| | | **एकूण** | **४७०३.६८** | **४९३३.७२** |

**७. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे किमान वेतन :--(पंरा-३)**

महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना शासन निर्णय दि. २१ जानेवारी, २००० नुसार महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे.

| ग्रामपंचायत वर्ग (लोकसंख्या) | कर्मचारी संख्या | कर्मचाऱ्यांचा प्रकार (प्रती ग्रामपंचायत) |
|---|---|---|
| (अ) ० ते १००० | १ | शिपाई/दिवाबत्ती/पाणीपुरवठा कर्मचारी -१ |
| (ब) १००१ ते ३००० | २ | शिपाई-१, दिवाबत्ती/पाणीपुरवठा कर्मचारी -१ |
| (क) ३००१ ते ६००० | ३ | लिपिक/वसुली कारकून-१, शिपाई-१, दिवाबत्ती/पाणीपुरवठा कर्मचारी-१ |
| (ड) ६००१ ते १०००० | ४ | लिपिक/वसुली कारकून-१, शिपाई १, दिवाबत्ती/पाणीपुरवठा कर्मचारी- १, सफाई कामगार-१ |
| (इ) १०००० वरील | ६ | लिपिक/वसुली कारकून-२, शिपाई-१, दिवाबत्ती/पाणीपुरवठा कर्मचारी-१, सफाई कामगार-२ |

वरील आकृतीबंधाप्रमाणे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनाचे अनुदान मागणी क्रमांक एल-२, प्रधानशिर्ष २०५३-जिल्हा प्रशासन-९३-जिल्हा आस्थापना-०७-मानधन व इतर भत्ते यासाठी अनुदाने (०७)(०१)-ग्रामपंचायतीचे सरपंच सदस्य यांचे मानधन व इतर भत्ते आणि कर्मचाऱ्यांचे किमान वेतन यासाठी अनुदाने (२०५३ १०४२) या अंतर्गत भागविण्यात येते.

**२.** शासन निर्णय दिनांक १४ मार्च, २०१४ नुसार खालीलप्रमाणे अनुदान वितरित करण्यात येते. (पंरा-३)

| अ. क्र. | लोकसंख्या व उत्पनानुसार ग्रामपंचयतीची वर्गवारी | किमान वेतनासाठी अनुज्ञेय शासन हिस्सा |
|---|---|---|
| १ | ० ते ५००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या व रुपये ० ते २,००,००० (वार्षिक) पर्यंत उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायतींना | १००% |
| २ | ० ते १०००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या व रुपये २,००,००१ ते ते ३,००,००० (वार्षिक) पर्यंत उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायतींना | ७५% |
| ३ | ३,००० ते १०,००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या व रुपये ३,००,००१ ते ते ५,००,००० (वार्षिक) पर्यंत उत्पन्न असलेल्या ग्रामपंचायतींना | ७५% |
| ४ | उर्वरित सर्व ग्रामपंचायतींना शासन निर्णय दिनांक २१ जानेवारी, २००० नुसार (पूर्वीप्रमाणेच) | ५०% (पूर्वीप्रमाणेच) |

**३.** उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे दिनांक १० ऑगस्ट, २०२० च्या अधिसूचनेनुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना दिनांक १ एप्रिल, २०२२ पासून खालीलप्रमाणे सुधारित किमान वेतन दर लागू करण्यात आलेले आहेत. तसेच सुधारित किमान वेतनातील दिनांक १ सप्टेंबर, २०२० ते दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंतचा फरक रक्कम ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना अदा करण्याबाबतचा निर्णय दिनांक १० जानेवारी, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

| **अ.क्र.** | **कर्मचारी वर्गवारी** | **मूळ किमान वेतन दर (दरमहा रुपये)** | | |
|---|---|---|---|---|
| | | **परिमंडळ-१ (१०००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायती)** | **परिमंडळ-२ (५००० ते १०००० लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायती)** | **परिमंडळ-३ (५००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायती)** |
| १ | कुशल (लिपिक) | १४१२५ | १३७६० | १२६६५ |
| २ | अर्ध कुशल | १३४२० | १३०५५ | ११९६० |
| ३ | अकुशल | १३०८५ | १२७१५ | ११६२५ |

**सरपंच, उपसरपंच मानधन व सदस्य बैठक भत्ता :** शासन निर्णय दिनांक ३० जुलै, २०१९ नुसार सरपंच, उपसरपंच यांना मानधन निश्चित करण्यात आला आहे. तसेच सदस्यांना एका वर्षात होणाऱ्या जास्तीत जास्त १२ बैठकापुरता रु. २००/- प्रति बैठक भत्ता देण्यात येतो. तथापि, दिनांक २४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सरपंच व उपसरपंच यांना देण्यात येणाऱ्या मानधनात खालीलप्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

शासनाकडून उक्त सरपंच व उपसरपंच मानधनासाठी ७५% अनुदान व सदस्य बैठक भत्त्यासाठी १००% अनुदान देण्यात येते.

| ग्रामपंचायतीची लोकसंख्यानिहाय वर्गवारी | सरपंच मानधन दरमहा रक्कम (रुपये) | उपसरपंच मानधन दरमहा रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| (अ) ० ते २००० पर्यंत लोकसंख्येच्या ग्रामपंचायती | ६००० | २००० |
| (ब) २००१ ते ८००० पर्यंत लोकसंख्येच्या ग्रामपंचायती | ८००० | ३००० |
| (क) ८००१ पेक्षा जास्त लोकसंख्येच्या ग्रामपंचायती | १०००० | ४००० |

**ग्रामसभा :** ग्रामसभा ही ग्रामपंचायत स्तरावरील सर्वोच्च संस्था आहे. ही बाब लक्षात घेऊन शासनाने ग्रामसभा बळकटीकरणासाठी महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियमात वॉर्डसभेची तरतूद तसेच महिला ग्रामसभेचाही अंतर्भाव करण्यात आला आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनिमानुसार वर्षातून ग्रामसभेच्या किमान ६ सभा घेण्याची तरतूद होती यामध्ये सुधारणा करण्यात आली असून ग्रामसभांमधील जनतेची उपस्थिती वाढावी म्हणून यामध्ये सन २०१२ मध्ये सुधारणा केली असून आता ६ ऐवजी ४ सभा घेण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच सदर सुधारणेनुसार ग्रामसभेच्या प्रत्येक नियमित सभेपूर्वी आणि ग्रामसभेच्या महिला सदस्यांच्या सभेपूर्वी प्रभाग (वॉर्ड) सभेची तरतूद करण्यात आली आहे. राज्य सरकार किंवा केंद्र सरकारकडून प्राप्त होणाऱ्या सूचनेच्या अनुषंगाने वेगवेगळे विषय ग्रामसभेत घेण्यात येतात.

**८. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना : (बांध ४) टप्पा - १**

* राज्यातील न जोडलेल्या वाड्या-वस्त्या जोडण्यासाठी व ग्रामीण भागातील रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २८-१०-२०१५ अन्वये मुख्यमंत्री ग्रामसडक योजना सुरू करण्यात आली आहे.

* या योजनेंतर्गत सन २०१५-१६ ते २०१९-२० या ५ वर्षांच्या कालावधीकरिता ३०,५९८ कि.मी. रस्त्यांच्या सुधारण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

* या योजनेंतर्गत आतापर्यंत एकूण ३०,५९८ कि.मी. लांबीच्या रु. १९९७८ कोटी किंमतीच्या ८०२६ कामांना प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. त्यापैकी साधारणपणे २९२५४ कि.मी. लांबीची कामे पूर्ण झाली असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत व सदरहू कामे माहे जून २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

* या योजनेसाठी विविध पाच स्त्रोतांद्वारे दिनांक २६-१२-२०२४ रोजीपर्यंत उपलब्ध झालेला रु. १८८००.०० कोटी इतका निधी खर्च झाला आहे.

**मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा - २**

* ग्रामीण भागातील दुरावस्था झालेल्या रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ या योजनेस दिनांक ६ जानेवारी, २०२२ रोजी मंजुरी दिली आहे.

* सदर योजनेंतर्गत २ वर्षांच्या कालावधीकरिता १०,००० कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या सुधारणेचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

* या योजनेंतर्गत आतापर्यंत एकूण ९९९७ कि.मी. लांबीच्या रु. ८७१५ कोटी किमतीच्या २०४३ कामांना प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. त्यापैकी साधारणपणे ८६९ कि.मी. लांबीची कामे पूर्ण झाली असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत व सदरहू कामे माहे जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

* या योजनेसाठी विविध पाच स्त्रोतांद्वारे दिनांक २६-१२-२०२४ रोजीपर्यंत उपलब्ध झालेला रु. १६६३.०० कोटी इतका निधी खर्च झाला आहे.

**९. श्रीमती सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना : (योजना ३)**

* स्वयंसहाय्यता गटांना व्याजावरील अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना सुरू केलेली आहे.

* महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोनाती अभियानांतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या व केंद्र शासनाकडून व्याज अनुदान प्राप्त झालेल्या पात्र महिला स्वयंसहाय्यता समुहांना सवलतीच्या व्याजदराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात येते.

* प्रवर्ग १ मधील जिल्ह्यांतील महिला स्वयंसहाय्यता समूहाला बँकेमार्फत ७% व्याजदर आकारण्यात येते. त्यामध्ये नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या स्वयंसहाय्यता समूहाला केंद्रशासनाकडून ३% व्याज अनुदान प्राप्त होते. अशा स्वयंसहाय्यता समूहाला ४% व्याज अनुदान राज्य शासनाकडून वरील योजनेतून देण्यात येते. प्रवर्ग २ जिल्ह्यांमधील

महिला स्वयंसहाय्यता समूहाना बँकेमार्फत सर्वसाधारणत: १२.५% व्याजदर आकारण्यात येतो. नियमित कर्जफेड करणाऱ्यांना महिला स्वयंसहाय्यता समूहाला केंद्र शासनाकडून ५.५% व्याज अनुदान देण्यात येते. अशा स्वयंसहाय्यता समुहाला ७% पर्यंत व्याज अनुदान राज्य शासनाकडून देण्यात येत आहे.

* आतापर्यंत एकूण २६५९४५ स्वयंसहाय्यता समूहांना रु. ४६.५५ कोटीचे व्याज अनुदान अदा करण्यात आलेले आहे.

* ०१ एप्रिल, २०२२ रोजीच्या रिझर्व बँक ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांना बँकामार्फत ७% व्याज दराने कर्ज पुरवठा करण्यात येत आहे. अशा स्वयं सहायता समुहांना ४.५% व्याज अनुदान केंद्र शासनाकडून अदा करण्यात येईल. सदर समुहांना २.५% राज्य शासन व्याज अनुदान सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजनेंतर्गत देण्याचे प्रस्तावित आहे.

* सन २०२४-२५ मध्ये रक्कम रु. १०.०० कोटी व्याज अनुदान वितरित करण्याचे नियोजित आहे.

**१०. जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या इमारतींच्या देखभाल दुरुस्ती करणेबाबत. (लेखाशिर्ष २०५९४५३१) :**

जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या इमारतींच्या देखभाल दुरुस्तीसाठी ग्रामविकास विभागामार्फत अनुदान जिल्हा परिषदांना थेट उपलब्ध करुन देण्यासाठी लेखाशिर्ष (२०५९ ४५३१) निर्माण करण्यात आले आहे. या लेखाशीर्षा अंतर्गत जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या सन १९६१ पर्यंतच्या व PRB मध्ये नोंद असलेल्या प्रशासकीय व निवासी इमारतींच्या देखभाल दुरुस्तीकरिता निधी वितरित करण्यात येतो.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या इमारतींच्या देखभाल दुरुस्तीसाठी एकूण रु. ४५.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पित झालेली आहे. त्यापैकी, मंजूर तरतुदीच्या १०० टक्केच्या मर्यादेत २०५९ ४५३१ (योजनांतर्गत) या लेखाशिर्षांतर्गत खर्च भागविण्याकरिता वित्त विभागामार्फत अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर निधी उपलब्ध करून दिलेला आहे.

**११. माहिती तंत्रज्ञान कक्ष :**

या विभागांतर्गत कार्यरत असणाऱ्या राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समिती व ग्रामपंचायत तसेच ग्रामविकास विभाग (खुद्द) यांच्यासाठी विविध संगणकीकरणाचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने खालील प्रकल्पांचा अंतर्भाव होतो.

१. जिल्हा परिषद कर्मचारी वर्ग-३ (जिल्हा परिषद शिक्षक वगळून) यांचे दर महिन्याचे वेतन अदा करण्यासाठी पंचायतराज सेवार्थ प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

२. राज्यातील जिल्हा परिषदांना विविध प्रकारचा निधी वितरित केला जातो त्यासाठी LPRS ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

३. जिल्हा परिषद स्तरावरील निधीचे वितरण व संनियंत्रण करण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकसूत्रता रहावी यासाठी ZPFMS ही प्रणाली विकसीत करण्यात आली आहे.

४. ग्राम विकास विभागातील ई-गव्हर्नन्स प्रकल्पासाठी क्लाऊड सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी कंपनी नियुक्त करण्यात आली आहे.

५. राज्यातील जिल्हा परिषद शिक्षक कर्मचाऱ्यांच्या आंतरजिल्हा व जिल्हा अंतर्गत बदलीसाठी ऑनलाईन प्रणालीशी संबंधित बाबी.

६. राज्यातील जिल्हा परिषदांच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी निवृत्तीवेतन प्रणाली विकसित करण्यात येत आहे.

७. ग्रामविकास विभागाचे दैनंदिन कामकाज हे जलदगतीने होण्यासाठी संगणक, प्रिंटर व इतर साधनांची खरेदी संबंधित बाबी.

**आपले सरकार सेवा केंद्र :--**

* केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पंचायती राज संस्थांच्या कारभारामध्ये ई-पंचायत प्रकल्पांतर्गत अभिप्रेत असलेली एकसूत्रता व पारदर्शकता आणणे, नागरिकांना विविध प्रशासकीय विभागांतर्गत आवश्यक असलेले सेवा/दाखले त्यांच्या रहिवासी क्षेत्रात कालबद्ध स्वरूपात मिळणे, तसेच इतर व्यावसायिक सेवा, विविध प्रकारच्या बँकिंग सेवा (सर्व GRC व BRC सेवा) ग्रामीण जनतेला एकाच केंद्रावर मिळाव्या या हेतूने राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये **"आपले सरकार सेवा केंद्र (ग्रामपंचायत) (ASSK-GP)"** उभारणी व अंमलबजावणीबाबत

मार्गदर्शक सूचना बाबतचा शासन निर्णय क्रमांक : संग्राम-२०१५/प्र.क्र. ९३/संग्राम कक्ष दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेला असून ग्रामविकास विभाग शा.नि.क्र. संग्राम-२०१५/प्र.क. ९३/संग्राम कक्ष दि. १४ जानेवारी, २०२१ अन्वये त्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

* ग्रामपंचायत पातळीवर आपले सरकार सेवा केंद्र (ग्रामपंचायत) हा प्रकल्प रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड व आईटीआई लिमिटेड या केंद्र शासनाच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमामार्फत राबविण्याचा निर्णय शासनाने शा.नि.क्र.आ.स.से.कें-५०२४/प्र.क्र.६६/मा.तं.क. दि. १९ सप्टेंबर, २०२४ अन्वये घेतला आहे.
* या प्रकल्पामुळे पंचायती राज संस्थांचा कारभार संगणकीकृत होऊन ई-पंचायत प्रकल्पांतर्गत अभिप्रेत असलेली एकसूत्रता व पारदर्शकता आणणे शक्य होईल. तसेच ग्रामपंचायतीद्वारा देण्यात येणारी G२C सेवा नागरिकांना आता **"आपले सरकार सेवा केंद्र ग्रामपंचायत"** मार्फत उपलब्ध होत आहेत.
* आपले सरकार सेवा केंद्रातून पुढीलप्रमाणे सेवा देण्यात येतात.

**१. ग्रामपंचायतींच्या प्रशासनाचे संगणकीकरण (G२G) सेवा :--**

**१.१ ग्रामपंचायतींच्या लेखा संहिता २०११ मधील दैनंदिन कामकाजाचे १ ते ३३ नमुने**

**१.२ ई-पंचायत कार्यक्रमा अंतर्गत ११ NIC आज्ञावली.**

१. नॅशनल पंचायत डिरेक्टरी/लोकल गव्हर्नमेन्ट डिरेक्टरी
२. नॅशनल पंचायत प्रोफाईलर/एरिया प्रोफाईलर
३. प्लॅन प्लस
४. प्रियासॉफ्ट
५. ॲक्शन सॉफ्ट
६. ॲसेट डिरेक्टरी
७. सर्विस प्लस
८. ट्रेनिंग मॅनेजमेंट
९. सोशल ऑडीट व मिटिंग मॅनेजमेंट
१०. नॅशनल पंचायत पोर्टल
११. बेसिक GIS प्रणाली

**२. ग्रामपंचायतीद्वारा देण्यात येणारे दाखले/प्रमाणपत्र (G२C) सेवा :--**

| अ. क्र. | दाखले/प्रमाणपत्र |
|---|---|
| १. | जन्म नोंदणी व प्रमाणपत्र |
| २. | मृत्यूची नोंदणी व प्रमाणपत्र |
| ३. | रहिवासाचा दाखला व प्रमाणपत्र |
| ४. | विवाहाचा दाखला |
| ५. | नोकरी व्यवसायासाठी ना-हरकत प्रमाणपत्र |
| ६. | मालमत्ता आकारणी प्रमाणपत्र |
| ७. | मालमत्ता फेरफार प्रमाणपत्र प्रत |
| ८. | नादेय प्रमाणपत्र |
| ९. | बेरोजगार प्रमाणपत्र |
| १०. | विजेच्या जोडणीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र |
| ११. | कोणत्याही योजनेचा फायदा घेतला नसल्याचे प्रमाणपत्र |
| १२. | शौचालय दाखला |
| १३. | जॉब कार्ड |
| १४. | बांधकामासाठी अनुमती प्रमाणपत्र |
| १५. | नळजोडणीसाठी अनुमती प्रमाणपत्र |
| १६. | चारित्र्याचा दाखला |
| १७. | निराधार योजनेसाठी वयाचा दाखला |
| १८. | दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र |
| १९. | हयातीचा दाखला |

**३ ग्रामपंचायतीशी संबंधित नसलेल्या व लोकांसाठी उपयोगी इतर सेवा (G२C / B२C)**

* शासनाच्या इतर विभागांमार्फत देण्यात येणाऱ्या सेवा तसेच ग्रामीण नागरिकांना आवश्यक असलेल्या इतर व्यावसायिक सेवा (शासन सेवांव्यतिरिक्त) उदा. रेल्वे, बस आरक्षण डीटीएच रिचार्ज, बँकिंग सेवा, आर्थिक समावेशन, ई-कॉमर्स, पॅनकार्ड, आधार नोंदणी, विमा हप्ते भरणे, पासपोर्ट, इलेक्ट्रीसिटी बील, पोस्ट विभागाच्या सेवा इत्यादी सेवा सुद्धा या केंद्रावर उपलब्ध असतील व त्यामाध्यमातून सदर केंद्र भविष्यात स्वयंपूर्ण (Self-Sustainable) बनण्यासाठी प्रयत्न केले जातील.

**१२. आर. आर. (आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार योजना :**

* दिनांक २१ नोव्हेंबर, २०१६ पासून स्मार्ट ग्राम योजना सुरू करण्यात आली असून ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. स्माग्रायो-२०२०/प्र.क्र. ३९/यो-११, दि. २०/३/२०२० पासून स्मार्ट ग्राम योजनेचे नाव बदलून आर. आर. (आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार योजना असे करण्यात आले आहे.

* सदर योजनेंतर्गत प्रत्येक तालुक्यातील एका गावाला सुंदर गांव पुरस्कार जाहीर करण्यात येते. तसेच जिल्ह्यातील सर्वाधिक गुण प्राप्त गावाला जिल्हा सुंदर गांव म्हणून निवडण्यात येते.

* तालुकास्तरावर गाव निवड करण्याची कार्यपध्दती- तालुका तपासणी समिती गटविकास अधिकारी / सहा. गट विकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून सदर समिती स्वत:च्या तालुक्यात तपासणी न करता जिल्ह्यातील इतर तालुक्यातील गाव निवड करण्यासाठी तपासणी करते. आर. आर. (आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार योजना अंतर्गत निवडीचे निकष व गुणांकण हे स्वच्छता, व्यवस्थापन, दायित्व, अपारंपरिक उर्जा व पर्यावरण आणि पारदर्शकता व तंत्रज्ञान इत्यादी गावातील भौतिक सुविधाच्या आधारे तपासणी करून गुणांकण करण्यात येते.

* जिल्हास्तर सुंदर गांव निवड करण्याची पद्धत- संबंधित जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा तपासणी समिती तथा स्थानिक देखरेख समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीमार्फत जिल्हा आदर्श ग्राम निवड करण्यात येते.

* सुंदर गांव पुरस्कार योजनेचे संनियंत्रणासाठी राज्यस्तरीय संनियंत्रण समिती मा. मंत्री ग्रामविकास यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली आहे.

* सदर योजनेंतर्गत तालुकास्तरावर निवड झालेल्या आर. आर. (आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार म्हणून गावांना रु. १० लक्ष पारितोषिक देण्यात येते.

* तसेच जिल्हा सुंदर गाव निवड झालेल्या अशा जिल्ह्यातील एका सुंदर गावांना पुरस्कार म्हणून रु. ४० लक्ष पारितोषिक देण्यात येते.

* सदर योजनेसाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता २५१५१६७७ या लेखाशिर्षाखाली रु. ४०.०० कोटी निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

**१३. मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना. (लेखाशिर्ष २५१५ २५५७) : बांध-४**

राज्यातील एकूण २८००६ ग्रामपंचायतीपैकी जवळपास ४,२५२ ग्रामपंचायतींना स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारती नाहीत. या ग्रामपंचायतीपैकी बहुतांश ग्रामपंचायती या लोकसंख्येने लहान, आर्थिकदृष्ट्या कमकुवत अथवा दुर्गम भागातील आहेत. केंद्र शासनाच्या राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानांतर्गत ग्रामपंचायत इमारत बांधकामासाठी मिळणारा निधी सन २०१५-१६ पासून बंद करण्यात आलेला आहे. त्यामुळे, ग्रामीण भागासाठी असणाऱ्या आवश्यकता व त्यासाठी उपलब्ध असणाऱ्या स्त्रोतांची उणीव लक्षात घेऊन राज्यातील ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या २००० पेक्षा कमी आहे व स्वत:च्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही अशा ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालय इमारत बांधण्यासाठी मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २०१८ अन्वये सुरू करण्यात आली आहे. तसेच प्रस्तुत धोरणात शासन निर्णय दिनांक २ नोव्हेंबर, २०१८ अन्वये सुधारणा करण्यात आली असून कार्यालयाची इमारत नसलेल्या सर्व ग्रामपंचायतींचा समावेश करण्यात आला आहे.

या योजने अंतर्गत सप्टेंबर, २०२२ अखेर एकूण १७४१ ग्रामपंचायतींना स्वत:चे कार्यालय बांधण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

तद्नंतर, ग्राम विकास विभागाच्या दिनांक १ डिसेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार, मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेतील अटी संदर्भात सुधारणा करून सदर योजना राबविण्यास सन २०२३-२४ ते सन २०२७-२८ या चार वर्षांसाठी मुदतवाढ देण्यात आली. तसेच, ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या २००० पर्यंत आहे

अशा ग्रामपंचायतीला रु. २०.०० लक्ष व ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या २००० पेक्षा जास्त आहे अशा ग्रामपंचायतीला रु. २५.०० लक्ष इतके सहायक अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार या योजनेंतर्गत पात्र १८६० ग्रामपंचायतींना मंजुरी प्रदान करण्यात आलेली असून, आतापर्यंत एकूण ३६०८ ग्रामपंचायतींना मंजूरी देण्यात आली आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेकरिता रु. ११०.०० कोटी इतकी तरतूद लेखाशीर्ष (२५१५ २५५७) अंतर्गत अर्थसंकल्पीत झालेली आहे. त्यापैकी रु. २.४७ कोटी इतका निधी वित्त विभागामार्फत सदर लेखाशीर्षांतर्गत खर्च भागविण्यासाठी निधी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**१४. रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (राज्य पुरस्कृत योजना) : (बांध ३)**

ग्रामीण मार्ग रस्त्यांची देखभाल दुरूस्ती राज्यातील जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील व ग्रामीण मार्ग रस्त्यांसाठी देखभाल व दुरुस्ती, इतर जिल्हा मार्ग, (लेखाशिर्ष ३०५४-२४१९) हा विषय सन २०१२-१३ या आर्थिक वर्षापासून ग्रामविकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. त्यानुसार ग्रामविकास विभागाच्या दि. १० सप्टेंबर, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२००१-२०२१ च्या रस्ते विकास आराखड्यानुसार जिल्हा परिषदे अंतर्गत असलेल्या या रस्त्यांची लांबी खालीलप्रमाणे आहे :-

**ग्रामविकास विभाग**

| रस्त्याचा प्रकार | | रस्त्याची लांबी (कि.मी.) |
|---|---|---|
| १. इतर जिल्हा मार्ग | : | ४७१०८.७३ |
| २. ग्रामीण मार्ग | : | १६८७९६.७० |
| **एकूण** | **:** | **२१५९०५.४३** |

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी लेखाशिर्ष ३०५४ २४१९ रस्ते व पूल दुरुस्ती कार्यक्रमासाठी रु. ६४९.६४३० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित केलेला आहे. सदर निधीपैकी २७-लहान बांधकामे या उद्दिष्टाखाली रु. ५००.०० कोटी व मैलमजुरांच्या वेतनासाठी ३६-सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली रु. १४९.६४३० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

**१५. अतिवृष्टी व पूरहानी कार्यक्रम (३०५४-२९११) (राज्य पुरस्कृत योजना) :**

१. अतिवृष्टी व पूरहानीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी नवीन कार्यक्रम/योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. विभागाच्या दि. ०९ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

३. त्यानुसार सदर योजनेंतर्गत जिल्ह्यातील अत्यावश्यक कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करून प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

४. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी लेखाशिर्ष ३०५४-२९११ अतिवृष्टी व पूरहानी कार्यक्रमासाठी रु. १०५.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित केलेला आहे.

**१६. स्टार्ट-अप ग्रामीण उद्योजकता कार्यक्रम-महाराष्ट्र (योजना ३)**

* महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील महिलांच्या संस्था स्थापन करुन व त्या सबळ करुन, या कुटुंबांना दारिद्र्यरेषेवर आणण्याचे काम उमेद करीत आहे. या संस्थांना क्षमता विकास, आर्थिक व जीवनमान उंचावण्यासाठी मदत केली जाते. जीवनमान उंचावण्याच्यादृष्टीने उमेद गरीबांना स्वयंरोजगार निर्मितीसाठी काम करीत आहे. त्यामुळे ग्रामीण भागात कुटीरोद्यागांची निर्मिती व तरुणांना उद्योग वाढीसाठी प्रवृत्त करण्यासाठी, भारत शासनाच्या ग्रामविकास मंत्रालयाने SVEP या योजनेच्या अंमलबजावणीसाठी नेमलेल्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोनती अभियान आणि स्वयंम शिक्षण प्रयोग- EDIL या वर्गीकृत (MRLIF २०१५ मधून निवडण्यात आलेली संस्था) संस्थेची उमेद ने भागीदारी केली आहे.

* सोलापूर जिल्ह्यातील बार्शी व मोहोळ, ठाणे जिल्ह्यातील शहापूर, पालघर जिल्ह्यातील पालघर, जालना जिल्ह्यातील जालना व भोकरदन, यवतमाळ जिल्ह्यातील कळंब, पांढरकवडा केळापूर या तालुक्यातील गावांमध्ये ग्रामीण उद्योग निर्मितीसाठी मदत करुन, आर्थिक प्रगतीला उत्तेजन देऊन गरीबी व बेरोजगारी कमी करणे हे SVEP कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. पर्यावरणीय पध्दतीने स्वाभाविकपणे तयार केलेले योजनेचे संकल्पना ही SVEP कार्यक्रमाचे अद्वितीय वैशिष्ट्य आहे.

* महाराष्ट्र राज्यात राज्य ग्रामोद्योग योजनेची (SVEP) अंमलबजावणी करण्यामागची मुख्य उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:-

१. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी व मोहोळ, ठाणे जिल्ह्यातील शहापूर, पालघर जिल्ह्यातील पालघर, जालना जिल्ह्यातील जालना व भोकरदन, यवतमाळ जिल्ह्यातील कळंब, पांढरकवडा या तालुक्यातील मुख्यत: स्वयंसहाय्यता बचतगटातील ग्रामीण गरीबांना मदत करून बिगरशेती लघु उद्योगांद्वारे या ५ जिल्ह्यात स्वयंरोजगार निर्माण करण्यास मदत करणे जेणेकरून गरीबी दारिद्र्यरेषेच्या वर येईल.

२. वरीलप्रमाणे अंमलबजावणी करण्यासाठी गावस्तरीय व्यवसाय सखी (CRP-Eps) निर्माण करावेत व या गटांमध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोनती अभियानातील गट अधिकारी सामावून घ्यावेत, जेणेकरून स्थानिक आर्थिक विकासासाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे, रोजगार निर्मिती व गरीबीवर मात करण्यासाठी हे घटक एकत्रितपणे काम करू शकतील. गरीब लघु उद्योजकांना निरपेक्ष अनेक प्रकारची मदत करून त्याद्वारे त्यांचे ज्ञान, सल्ला व आर्थिक बाबींमधील त्रुटींवर मात करता येईल अशा सुधारित लघु उद्योग प्रतिकृतीची अंमलबजावणी करा.

* सन २०२४-२५ या वर्षासाठी केंद्र हिस्सा १२.०० कोटी व राज्य हिस्सा ८.०० कोटी सोलापूर, ठाणे, पालघर, जालना व यवतमाळ या पाच जिल्ह्यांसाठी तरतूद करण्यात आलेली आहे.

**१७. अस्मिता योजना (योजना ३)**

* राज्यात ग्रामीण भागातील महिला व किशोरवयीन मुलींमध्ये सॅनिटरी नॅपकिन व वैयक्तिक स्वच्छतेबाबत जाणीव जागृती व्हावी, त्यांना माफक दरात सहज सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध व्हावेत या उद्देशाने अस्मिता योजना ग्रामविकास विभागामार्फत आंतरराष्ट्रीय महिला दिनी ०८ मार्च, २०१८ रोजी या योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

* या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना रुपये २४ एवढ्या किंमतीत तर जिल्हा परिषदेच्या शाळेतील किशोरवयीन मुलींना केवळ रु. ५ एवढ्या माफक दरात सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करुन दिले जाते.

* या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातील स्वयंसहाय्यता गटांना स्थानिक पातळीवर सॅनिटरी नॅपकिन विक्रीची जबाबदारी देण्यात आलेली आहे. अस्मिता उमेद मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून त्यामाध्यमातून स्वयंसहाय्यता गट सॅनिटरी नॅपकिनची खरेदी करतात.

* जिल्हा परिषदेच्या शाळेतील किशोरवयीन मुलींना अस्मिता कार्ड देण्यात आले आहे. त्या माध्यमातून त्या सॅनिटरी नॅपकिन खरेदी करत आहेत.

* ग्रामीण भागात सॅनिटरी नॅपकीन वापराचे प्रमाण केवळ १७ टक्के असून ते ७० टक्केपर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट आहे.

* दिनांक ३१ मार्च, २०२२ अखेर ५०,६७० स्वयंसहाय्यता गटांची अस्मिता योजनेअंतर्गत नोंदणी करण्यात आलेली आहे. तर अस्मिता कार्डसाठी ३,७१,९८० जिल्हा परिषद शाळेतील किशोरवयीन मुलींची नोंदणी झालेली आहे.

**१८. थोर राष्ट्रपुरुष किंवा प्रसिद्ध व्यक्ती ज्याच्या नावे स्मारक उभारणे. (योजना ११)**

ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, क्र. स्मारक-२०१६/प्र.क्र. ०३/पंरा-९, दिनांक ११-८-२०१६ नुसार राज्यातील ग्रामीण क्षेत्रात राष्ट्रपुरुष/थोर व्यक्ती तसेच अन्य प्रसिद्ध मान्यवर व्यक्ती यांची स्मारके उभारण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्मारक समिती गठीत करण्यात येते. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्मारक समिती गठीत करण्यात येते. जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त स्मारक अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाकडे छाननीसाठी पाठविले जाते. त्यानंतर स्मारक आराखड्यास प्रशासकीय मान्यता देवून निधी वितरित केला जातो. मोठ्या किमतीच्या आराखड्यांना मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील समितीची मान्यता घेतली जाते.

i) स्मारक बांधकामासाठी लागणारी जमीन ही शासकीय किंवा जिल्हा परिषदेच्या मालकीची असावी.

ii) स्मारकाच्या देखभाल व दुरूस्तीसाठी शासनाकडून कोणतेही अनुदान देण्यात येत नाही.

iii) त्यामुळे स्मारक देखभाल व दुरुस्ती संबंधित स्मारक समिती करण्यास तयार आहे किंवा कसे ? याबाबत करारपत्र घेण्यात येते.

iv) जिल्हा परिषद क्षेत्रात दोन पेक्षा जास्त स्मारके उभारावयाची झाल्यास स्मारकासंदर्भातील जागा व होणारा खर्च, स्मारकाची मागणी करणाऱ्या संस्थेने किंवा व्यक्तीने करावा. यासाठी शासनाकडून कोणतेही अनुदान देण्यात येत नाही.

v) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्मारक समिती गठीत केल्याशिवाय स्मारक उभारणीबाबत शासन स्तरावरून कोणतीही कार्यवाही करता येत नाही.

vi) मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय स्मारक समितीची अंतिम मान्यता प्राप्त झाल्यानंतरच स्मारक उभारणीबाबतच्या बांधकाम आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येते व निधी वितरीत करण्यात येतो.

vii) सदर योजनेसाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात २५१५२४८६ या लेखाशीर्षाखाली रु. २४.५० कोटी निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे.

**१९. कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम : (योजना ६) :--**

**योजना सुरू झाल्याचा दिनांक :-** शासन निर्णय क्र. कोवियो-२०१३/प्र.क्र.७१/योजना-९, दि. २६/८/२०१३ अन्वये योजना सुरू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णय अधिक्रमित करून योजनेच्या सुधारित तरतुदी शासन निर्णय क्र. ग्रासयो-२०१५/प्र.क्र.७५/योजना-९, दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५ अन्वये विहीत करण्यात आल्या आहेत.

**योजनेचा मूळ विभाग :-** ग्रामविकास विभाग

**योजचे स्वरूप :-** कोकणातील ग्रामीण भूमीपुत्रांना त्यांच्या गावात रोजगार व स्वंय-रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिने तसेच कोकणातील विकास कामांची गती वाढविणे याकरीता ग्रामीण भागातील पर्यटनाला चालना देण्यासाठी, पर्यटनाचा विकास होणाऱ्या गावांमध्ये पर्यटनासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे व पर्यायाने गावांचा विकास करणे या उद्देश्याने राज्य शासनाने "कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम" ही योजना सन २०१३-१४ पासून सुरू केलेली आहे.

कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत विकास आराखडा तयार करणे व आराखड्यातील कामांना मंजुरी देण्याकरिता कोकणातील ५ जिल्ह्यांकरिता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारिणी समिती तसेच विभागाच्या दिनांक २९/७/२०२० रोजीच्या शासन निर्णयाची सुधारणा करून राज्यस्तरीय समिती मा. मंत्री ग्रामविकास यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेली आहे. या शासन निर्णयाद्वारे कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम ही योजना कशा पद्धतीने राबविण्यात यावी, याबाबतच्या मार्गदर्शक सूचना देखील निर्गमीत केलेल्या आहेत.

या योजनेतंर्गत हाती घ्यावयाच्या कामांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | कामाचे स्वरूप |
|---|---|
| १. | गावांतर्गत पर्यटन स्थळापर्यंतचे पोच रस्ते बांधणे |
| २. | सार्वजनिक विद्युत दिवे लावणे. |
| ३. | सार्वजनिक जलनि:सारण व्यवस्था करणे. |
| ४. | स्वागत कक्ष उभारणे. |
| ५. | प्रसाधन गृह व स्वच्छता गृह बांधणे. |
| ६. | वाहन तळ उभारणे. |
| ७. | पारंपरिक साहित्य विक्रीकरिता दुकान/गाळा उभारणे. |
| ८. | सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी खुल्या मंचाची व्यवस्था करणे (Open Stage) |
| ९. | सांस्कृतिक केंद्र उभारणे. |

**२. पर्यटनविषयक साहित्य व उपकरणे :-**

१. जलक्रिडा उपकरणे (Water Sports Equipments) खरेदी करणे.
२. सार्वजनिक वाहतुकीसाठी मिनी बसेस (Mini Buses) उपलब्ध करून देणे.
३. संगीत वाद्ये (Musical Equipments), पर्यटनाशी संबंधित मानववंशीय वाद्ये (Ethnical Equipments) खरेदी करणे.
४. नकाशे, पर्यटनविषयक ब्रोशर, पुस्तके/साहित्य खरेदी करणे.
५. रस्ते/स्थळ दर्शविणारे फलक लावणे.
६. Wi-Fi सुविधा पुरविणे.

**३. प्रशिक्षण व क्षमता बांधणी**

प्रशिक्षण अभ्यास क्रमाची फी, प्रशिक्षण देण्याकरिता आमंत्रित करण्यात येणाऱ्या मान्यवरांचे मानधन, प्रशिक्षण साहित्यासाठी येणारा खर्च

**४.** पर्यटनदृष्ट्या उपयुक्त असणाऱ्या गावांच्या समुहांची, तेथील सोयी-सुविधांची व पर्यटनविषयक स्थळांची पर्यटकांना माहिती देण्यासाठी (Publicity Awareness) एखादी सामाईक यंत्रणा उभारणे.

**५.** पर्यटनदृष्ट्या उपयुक्त असणाऱ्या गावांच्या सौंदर्य स्थळांची सुधारणा/बळकटीकरण करण्यासाठी संकल्प चित्र व वास्तुविशारद यांच्या सेवा उपलब्ध करून घेणे. (समुद्र किनारे पर्यटनाकरिता विकसित करताना पर्यटकांच्या सुरक्षिततेसंदर्भातील पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन निर्णय क्रमांक टीडीसी-२००६/३/प्र.क्र.६/पर्यटन, दि. ८ सप्टेंबर, २००६ मधील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.)

---

**योजनेसाठी केलेली अर्थसंकल्पीय तरतूद व खर्च**

१) सन २०२१-२२ साठी तरतूद रु. १५.०० कोटी. खर्च ९०.५९ लक्ष.

२) सन २०२२-२३ साठी तरतूद रु. १५.०० कोटी. खर्च रु. १.०५ कोटी.

३) सन २०२३-२४ साठी तरतूद रु. १५.०० कोटी. खर्च १.२५ कोटी.

**श्री. संत सेवालाल महाराज, पोहरादेवी, जि. वाशिम :-**

* श्री. संत सेवालाल महाराज, पोहरादेवी, जि. वाशिम या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम लेखाशीर्ष (२५१५ २५८४) अंतर्गत उमरी व पोहरादेवी तीर्थक्षेत्र विकास आराखडा, ता. मानोरा, जि. वाशिम व श्री. संत सेवालाल महाराज, पोहरादेवी तीर्थक्षेत्र विकास आराखडा, ता. मानोरा, जि. वाशिम या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखड्यांना अनुक्रमे रु. ३२६.२४ कोटी व रु. ३९७.७४ कोटीची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

* श्री. संत सेवालाल महाराज, पोहरादेवी, ता. मानोरा, जि. वाशिम या तीर्थक्षेत्राचा मूळ विकास आरखडा रु. २५.०० कोटीचा असून दि. ८-३-२०१९ रोजी सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन रु. १००.०० कोटींच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली. त्यानंतर दि. १०-१-२०२३ रोजी दुसऱ्यांदा सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन रु. १६७.०९ कोटींच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली. त्यानंतर दि. २४-१-२०२४ रोजी तिसऱ्यांदा सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन रु. ३९७.७४ कोटींच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली. अशाप्रकारे आतापर्यंत तीनदा सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

* सदर योजनेसाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता २५१५२५८४ या लेखाशीर्षाखाली रु. १३०.०० कोटी निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

**२०. ग्राम विकास विभागांतर्गत योजनांची जाहीरात व प्रसिद्धी कार्यक्रम :--**

* ग्रामविकास विभागामार्फत ग्रामीण क्षेत्रातील जनतेशी निगडित विविध विकास योजना राबविण्यात येतात.

* या योजनांची माहिती जनसामान्यांना होणे, जनतेत योजनांबद्दल जनजागृती निर्माण होणे, त्यामध्ये जनतेचा सहभाग रहावा तसेच योजनांबद्दल जनतेच्या काही सूचना/आक्षेप असल्यास ते विचारात घेणे व या सर्वांमधून शासनाची प्रतिमा उंचावणे यासाठी या योजनांची सर्वंकष माहिती जनतेला असणे गरजेचे आहे.

* त्यामुळे या योजनांना व्यापक प्रसिद्धी देण्यासाठी ग्रामविकास विभागांतर्गत योजनांची जाहीरात व प्रसिद्धी ही योजना राबविली जाते.

* या योजनेसाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता ३४५१A२०६ या लेखाशीर्षाखाली रु. ५०.०० कोटी निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

**२१. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) :--**

* राज्यातील विविध यात्रास्थळांचा विकास करून त्या ठिकाणी भाविकांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात या हेतूने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) राबविण्यात येते.

* ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्राच्या महात्म्यामुळे सदर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी दररोज अंदाजे १५०० ते २००० भाविकांची किंवा त्यापेक्षा जास्त भाविकांची आणि यात्रा/उत्सवाच्या वेळी दरवर्षी चार लाखांपेक्षा जास्त भाविकांची उपस्थिती असते अशा यात्रास्थळांना आवश्यक इतर निकषांची पूर्तता झाल्यास राज्य निकष समितीद्वारा "ब" वर्ग दर्जा देऊन सदर

यात्रास्थळाच्या ठिकाणी भाविकांना आवश्यक मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी रु. ५.०० कोटीच्या मर्यादेत निधी उपलब्ध करून दिला जातो.

* सदर यात्रास्थळांच्या ठिकाणी पोहोच रस्ते, पोहोच रस्त्यावर पथदिवे, मंदीर परिसरात संरक्षण भिंत, पिण्याच्या पाण्यासाठी टाकी बांधणे, त्या ठिकाणी असलेल्या नदी/ओढ्यावर संरक्षण भिंत बांधणे, स्त्री/पुरुष शौचालय, स्नानगृह बांधणे, भक्त निवास, वाहनतळ, इ. सारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

* सदर योजनेसाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता २५१५२५६६ या लेखाशीर्षाखाली रु. ४५० कोटी निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

**२२. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजना :--**

* ग्रामीण भागातील मोठ्या तीर्थक्षेत्रांचा विकास करून त्या ठिकाणी भाविकांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात या हेतूने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजना राबविण्यात येते.

* या योजनेंतर्गत तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी पोहोच रस्ते, पोहोच रस्त्यावर पथदिवे, मंदीर परिसरात संरक्षण भिंत, पिण्याच्या पाण्यासाठी टाकी बांधणे, त्या ठिकाणी असलेल्या नदी/ओढ्यावर संरक्षण भिंत बांधणे, स्त्री/पुरुष शौचालय, स्नानगृह बांधणे, भक्त निवास, वाहनतळ इ. सारख्या आवश्यक मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी रु. ५.०० कोटी ते २५.०० कोटींच्या मर्यादेत निधी उपलब्ध करून दिला जातो.

* सदर योजनेसाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता २५१५२५२१ या लेखाशीर्षाखाली रु. १०० कोटी निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

**२३. संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजना (आस्था-५) :--**

ग्रामविकास विभाग, शा.नि.क्र. तांडा सुधार-२०२३/प्र.क्र. ६७/आस्था-५, दि. २३-०२-२०२४ अन्वये "संत सेवालाल महाराज बंजारा/लामण तांडा समृद्धी योजना" सुरू करण्यात आली आहे.

बंजारा/लमाण तांड्यांना महसुली गाव घोषित करणे, तांड्यात ग्रामपंचायत स्थापन करणे व इतर अनुषंगिक कामासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून बंजारा/लमाण तांड्यात मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

तसेच, बंजारा/लमाण/लभाण तांड्यात ग्रामपंचायत निर्मितीसाठी १००० इतकी लोकसंख्येची अट शिथिल करून दि. ९-१०-२०२४ च्या शासन निर्णयान्वये तांडा भागामध्ये ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी लोकसंख्येची अट ७०० इतकी करण्यात आली आहे.

## (ब) केंद्र-राज्य पुरस्कृत योजना

### १. महालक्ष्मी सरस प्रदर्शन आणि विभागीय/जिल्हास्तरीय प्रदर्शने : (योजना १)

**योजनेचे स्वरूप :** केंद्र व राज्य पुरस्कृत

**योजनेबाबतचा तपशील :**

केंद्र शासनाने दिनांक १-०४-१९९९ पासून सुरू केलेल्या "स्वर्णजयंतीग्राम स्वंरोजगार योजना" व सन २०११ पासून "महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान" या दारिद्रय निर्मुलनाच्या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबांना स्वयंसहायता बचतगट/वैयक्तिक स्वरोजगारी यांना बँकांचे कर्ज व शासकीय अनुदान देऊन स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देऊन त्यांना दारिद्रयरेषेच्या वर आणण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना/ महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत स्थापित करण्यात आलेल्या बचतगटांन/वैयक्तिक स्वरोजगारी लाभार्थ्यांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी या हेतुने केंद्र शासन व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरावर मुंबई येथे सन २००३ पासून दरवर्षी महालक्ष्मी सरस प्रदर्शन आयोजित करण्यात येते. **महालक्ष्मी सरस प्रदर्शनाकरिता रु. ४० लक्ष इतकी केंद्र शासनाकडून व रु. ५०.०० लक्ष** इतकी राज्य शासनाकडून आर्थिक तरतूद दरवर्षी करण्यात येते.

महालक्ष्मी सरसच्या धर्तीवर दारिद्रयरेषेखाली कुटुंबांचे जीवनमान उंचवावे व त्यांना रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे याकरिता तसेच दारिद्रयरेषेखालील स्वयंसहाय्यता गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण क्रमांक : **पणन २००८/प्र.क्र.७३८/यो.१ दिनांक २७-०२-२००९** अन्वये विभाग व जिल्हा स्तरावरील विक्री प्रदर्शने आयोजित करणे, ही योजना मंजूर करण्यात आलेली आहे.

महालक्ष्मी सदर प्रदर्शन तसेच विभागीय व जिल्हास्तरीय विक्री प्रदर्शनामुळे ग्रामीण भागातील उत्पादित वस्तुंना शहरी भागात बाजारपेठ उपलब्ध होत व शहरी भागातील लोकांना ग्रामीण भागातील नाविन्यपूर्ण वस्तू उपलब्ध होतात.

दि. २५-१२-२०२३ ते ७-१-२०२४ मधील मुंबई येथील महालक्ष्मी सरस प्रदर्शनामध्ये ५१० स्टॉलच्या माध्यमातून महाराष्ट्रातील तसेच इतर १९ राज्यातील एकूण ११०० महिला बचतगटाचे/स्वयंसहायता बचतगटाचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. या कालावधीमध्ये जवळपास २९.०० कोटी रुपयांची विक्री झाली. तसेच इतर राज्यातील सरस प्रदर्शनामध्ये सहभागी होण्यासाठी राज्यातील महिला बचतगटाचे/स्वयंसहायता बचतगटाचे प्रतिनिधी पाठविले जातात.

### २. जिल्हा व तालुकास्तरीय कायमस्वरुपी तालुका विक्री केंद्र बांधणे : (योजना १)

**योजनेचे स्वरूप :** राज्य पुरस्कृत :

**योजनेचा तपशील :** दारिद्रयरेषेखालील कुटुंबांचे जीवनमान उंचवावे व त्यांना रोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे यासाठी स्वयंसहाय्यता गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासन निर्णय दिनांक २७-२-२००९ अन्वये स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजने अंतर्गत कायमस्वरूपी तालुका विक्री केंद्र बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार प्रती तालुका विक्री केंद्राला रु. २५.०० लक्ष निधी वितरित करण्याबाबत निश्चित करण्यात आले.

सन २००९ ते २०१३ या कालावधीत टप्प्याटप्प्याने १८० कायमस्वरूपी तालुका विक्री केंद्रांना मंजुरी देऊन प्रती तालुका विक्री केंद्र रु. २५.०० लक्ष याप्रमाणे रु. ४५००.०० लक्ष इतका निधी वितरित करण्यात आलेला आहे. तालुका विक्री केंद्राच्या बांधकामामध्ये ठराविक बाबींचा समावेश करून रु. २५.०० लक्षच्या मर्यादेत टाईप प्लान मुख्य वास्तु शास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून बनवून घेण्यात आलेला आहे. सदर टाईप प्लाननुसार तालुका विक्री केंद्राचे बांधकाम करण्याचे बंधनकारक असल्याने शासन निर्णय दिनांक २७-०२-२००९ अन्वये कळविलेले आहे.

सदर बांधकामाकरिता येणाऱ्या खर्चाचे ढोबळ अंदाजपत्रक तयार न करता अंदाजे प्रती तालुका विक्री केंद्रास रु. २५.०० लक्ष याप्रमाणे निधी वितरित करण्यात आलेला आहे. सदर निधीमध्ये तालुका विक्री केंद्राचे बांधकाम पूर्ण होत नसल्याचे निर्दशनास आल्याने शासन पत्र दिनांक २९-०३-२०१४ अन्वये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान पायाभूत सुविधा अंतर्गत असलेल्या निधीतून ४६ तालुका विक्री केंद्रांना त्यांचे मागणीप्रमाणे जास्तीत जास्त अतिरिक्त रु. २५.०० लक्ष मर्यादेपर्यंत (म्हणजेच रु. ५०.०० लक्ष मर्यादेत) रु. १०७२.०० लक्ष इतका निधी उपलब्ध करून दिलेला आहे.

तालुका विक्री केंद्र बांधकामासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीसंबंधात आढावा घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

**३. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-प्रशासन : (योजना ५)**

**योजनेचे नाव : जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-प्रशासन**

केंद्र शासन पुरस्कृत व राज्य शासन पुरस्कृत ग्रामीण विकासाच्या विविध योजना व दारिद्र्य निर्मुलन विषयक कार्यक्रम यांचे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये संनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांची स्थापना करण्यात आली आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमधील सर्व पदे ही प्रतिनियुक्तीने भरण्यात येतात. या यंत्रणा सोसायटीज रजिस्टरी ॲक्ट, १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अंतर्गत पंजीकृत करण्यात केल्या आहेत.

दि. १ एप्रिल, २०२२ पुर्वी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-प्रशासन करीता केंद्र शासनाकडून ६० टक्के व राज्य शासनाकडून ४० टक्के निधी उपलब्ध करुन देण्यात येत होता. तथापि केंद्र शासनाच्या दिनांक ०१.११.२०२१ आदेशान्वये सदर यंत्रणा बंद करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यासअनुसरुण दि. ३१ मार्च, २०२२ च्या मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-प्रशासन ही १००% राज्य योजना म्हणून पुढील ५ वर्षे म्हणजेच दिनांक ०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२७ पर्यंत सुरु ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे तसेच पुर्वीच्या १५ पदांऐवजी ८ पदांचा नवीन आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. त्यासअनुसरुन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.जिग्राप्र-११२१/प्र.क्र.४३/योजना-५, दि.०१.०४.२०२२ रोजी शासन निर्णय निर्गमीत करण्यात आला आहे.

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमधील सध्याची कार्यरत पदे**

| क्रमांक | पद | एकूण |
|---|---|---|
| १. | प्रकल्प संचालक (अति. मुख्य कार्यकारी अधिकारी संवर्ग) | १ |
| २. | सहायक प्रकल्प अधिकारी (म.वि.से. वर्ग-२) | १ |
| ३. | सहायक लेखाधिकारी (वर्ग-३) | १ |
| ४. | कार्यालय अधिक्षक | १ |
| ५. | कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता | १ |
| ६. | विस्तार अधिकारी | १ |
| ७. | वरिष्ठ सहायक | १ |
| ८. | लिपीक टंकलेखक (कनिष्ठ सहायक) | १ |
| | **एकूण** | **८** |

**४. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान : (योजना ३)**

केंद्र शासनाने सन २०१० मध्ये स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे रुपांतर राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानात (Natioanl Rural Livelihoods Mission) (NRLM) केले.

राज्यात ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक १८ जुलै, २०११ च्या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर अभियान केंद्र शासन ६०% व राज्य शासन ४०% पुरस्कृत आहे.

"तळागाळातील गरिबांसाठी मजबूत अशा संस्थांची बांधणी करून त्याद्वारे लाभदायक स्वयंरोजगार व कुशल वेतनी रोजगाराची संधी मिळविणे गरीब कुटुंबाना शक्य व्हावे व त्याद्वारे दारिद्र्य कमी करणे, परिणामी कायमस्वरुपी तत्त्वावर त्यांच्या उपजिविकेत उल्लेखनीय सुधारणा करणे" हा अभियानांचा उद्देश आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची खालील मार्गदर्शक तत्त्वे आहेत.

१) दारिद्र्यातून बाहेर येण्याची गरिबांची प्रबळ इच्छाशक्ती आहे आणि ते करण्याची त्यांच्याकडे अंगभूत क्षमता आहे.

२) सामाजिक संघटन करण्यास, संस्थांची बांधणी करण्यास व त्यांचे सक्षमीकरण करण्याची प्रक्रिया करण्यास प्रेरणा देण्यासाठी बाह्य समर्पित व संवेदनक्षम आधारभूत रचना आवश्यक आहे.

३) ज्ञानाचा प्रसार, कौशल्य बांधणी, पतपुरवठा, बाजारपेठ आणि उपजिविकेच्या इतर सेवा उपलब्ध झाल्यास, या वाढत्या संघटनास खालून आधार मिळेल.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची खालील केंद्रभूत मुल्ये आहेत.

१) गरिबातील गरिबांचा अंतर्भाव व सर्व प्रक्रियामध्ये त्यांची अर्थपूर्ण भूमिका,

२) पारदर्शकता,

३) उत्तरदायित्व,

४) समानता-दुर्बलगटातील विशेषत: महिला व असुरक्षित गट,

५) भागीदारी,

६) नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रणाच्या सर्व टप्प्यांमध्ये गरिबांचा व त्यांच्या संस्थांचा मालकी हक्क व ठोस भूमिका.

राज्यामधील सर्वात कमी मानवी विकास निर्देशांक असलेल्या अहमदनगर, अकोला, अमरावती, *छत्रपती संभाजीनगर, बीड, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, गोंदीया, हिंगोली, जळगाव, जालना, कोल्हापूर, लातूर, नागपूर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, *धाराशिव, पालघर, परभणी, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर, ठाणे, वर्धा, वाशिम, यवतमाळ या ३४ जिल्ह्यातील ३५१ तालुके निवडून तेथे राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान Intensive पध्दतीने राबविण्यात येत आहे.

अशाप्रकारे या योजने अंतर्गत वरील ३४ जिल्ह्यांमधील ३५१ तालुक्यांकरिता सदर योजना NRLM Intensive पद्धतीने राबविण्यात येणार आहे.

सन २०२४-२५ या वर्षाकरिता शासनाने NRLM करिता रु. १९६८.४० कोटींचा वार्षिक कृती आराखडा तसेच राज्य शासनाकडे खालीलप्रमाणे तरतूद केलेली आहे :--

(रु. कोटीत)

| हिस्सा | (Non-Tribal) | (SCP) | (TSP) | (OTSP) | Total |
|---|---|---|---|---|---|
| केंद्र | ४९४.११ | १६२.७६ | ४५ | -- | ७०१.८७ |
| राज्य | ३२९.४१ | १०८.५० | ३० | -- | ४६७.९१ |

*(महाराष्ट्र शासन राजपत्र महसूल विभाग, अधिसूचना दि. २४.०२.२०२३ नुसार नावामध्ये बदल)

*** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत महिला किसान सशक्तीकरण परियोजना :- (योजना ३)**

महिला किसान सशक्तीकरण परियोजना अंतर्गत केंद्र शासनाने दिनांक ७ जानेवारी, २०११ अन्वये मार्गदर्शक सूचना विहित केल्या आहेत. सदर योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील शेतकरी महिलांचा दर्जा उंचावणे, ग्रामीण भागातील महिलांना शाश्वत कृषी क्षेत्रातील जीवनमानाच्या संधी उपलब्ध करून देणे, या महिलांना कृषी तसेच अकृषी क्षेत्रातील कौशल्य व क्षमतेमध्ये वाढ करणे, या महिलांचा शासकीय तसेच शासनाच्या इतर संस्थांशी संपर्क करून देणे आणि या महिलांना कुटुंब व समाजस्तरावर खाद्य व पोषण सुरक्षा देणे हा आहे. हे करीत असताना त्यांच्यातील कौशल्याचा विकास करणे, त्यांच्यातील व्यवस्थापन क्षमता वाढविणे जेणेकरून शेतीमध्ये बायोडाव्हरसिटीच्या व्यवस्थापनामध्ये याचा उपयोग होईल, याबाबतचा विचार या योजने अंतर्गत करण्यात आला आहे. या योजने अंतर्गत राबविण्यात येणारे प्रकल्प CBOs, SH Federations, पंचायतराज संस्था किंवा इतर शासकीय संस्थांमार्फत राबविण्यात येतात.

या योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीच्या प्रमाणे ६०% केंद्र शासनाचा हिस्सा, ४०% राज्य शासनाचा हिस्सा व प्रकल्प राबविणारी संस्था असे असते. सन २०२४-२५ या वर्षाकरिता केंद्र शासनाने MKSP करिता ३२.५८ कोटींचा वार्षिक कृती आराखडा मंजूर केलेला आहे.

**५. दिनदयाळ उपाध्याय-ग्रामीण कौशल्य योजना** (योजना ३)

आपल्या देशात ग्रामीण भागात बरेच युवक व युवती हे अनेक कारणांमुळे शालेय शिक्षणानंतर उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. त्यामुळे त्यांच्याकडे रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने त्यांच्याकडे योग्य कौशल्ये नसतात. त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. त्याअनुषंगाने केंद्र शासनाने दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील युवक व युवतींना कमी कालावधीचे (तीन महिने ते एक वर्षाचे) कौशल्य प्रशिक्षण देवून त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यास सुरूवात केलेली आहे. हा कार्यक्रम PPP (Public Private Partnership) च्या माध्यमातून राबविला जातो. ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांचे उत्पन वाढीसाठी प्रयत्न करण्याचा या योजनेचा उद्देश आहे. यासाठी ग्रामीण भागातील ८ वी पास बेरोजगार युवक-युवतींना त्यांच्या इच्छेनुसार प्रशिक्षण देऊन महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाने लागू केलेल्या किमान वेतन कायदा (Minimum Wages Act) दराने रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम करण्यात येत आहे.

**योजनेची ठळक वैशिष्टे :**

१. पूर्णपणे मोफत असे ३ महिन्याचे निवासी प्रशिक्षण.
२. मार्केटनुसार तसेच नोकरीची शाश्वती असलेले प्रशिक्षण.
३. ७०% प्रशिक्षणार्थींना नोकरीची हमी.
४. ग्रामीण युवकांना १८ ते ३५ वयोगटातील तसेच आदिवासी, विधवा, वेठबिगारी ह्यांच्यासाठी वरील वयोमर्यादा ४५ एवढी शिथिल करण्यात आलेली आहे.
५. एस.सी.-३१%, एस.टी.-२५%, अल्पसंख्यांक-२०%, महिला-३३% याचे अनिवार्य सामाजिक समावेशन केले आहे.

सन २०२४-२५ या वर्षाकरिता राज्य शासनाद्वारे खालीलप्रमाणे तरतूद केलेली आहे.

(रु. कोटीत)

| हिस्सा | (Non-Tribal) | (SCP) | (TSP) | (OTSP) | Total |
|---|---|---|---|---|---|
| केंद्र | ९.७२ | ५.६४ | ४.०८ | -- | १९.४४ |
| राज्य | ६.४८ | ३.७५ | २.७३ | -- | १२.९६ |

* सहभागी प्रकल्प अंमलबजावणी संस्था व प्रकल्प : २०६
* सध्या कार्यकर प्रकल्प अंमलबजावणी संस्था व प्रकल्प : १०५
* प्रशिक्षित युवक-युवतींची संख्या : ७२६४७
* सध्या प्रशिक्षण घेत असलेले : २४२३
* रोजगार उपलब्ध युवक-युवतींची संख्या : ४९२२६

**ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (RSETI) --(योजना ३)**

आरसेटी ही योजना सन २००९ मध्ये केंद्र शासनामार्फत सुरू करण्यात आली. आरसेटीची संकल्पना ही कर्नाटक येथे श्री क्षेत्र धर्मस्थळ एज्युकेशन ट्रस्ट यांच्यातर्फे राबविलेल्या (RUDSETI) यावर आधारित आहे. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील व १८ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना स्वयंरोजगारासाठी १० ते ४५ दिवसांचे विविध व्यवसायाचे (शेती व बिगर शेती) निवासी व विनामुल्य/मोफत प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण केंद्र चालविण्याची पूर्ण जबाबदारी त्या त्या जिल्ह्यातील Lead Bank कडे सोपविण्यात आलेली आहे. प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात किमान एक एकर जमीन बँकेला उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्यात एकूण ३५ RESTIs आहेत. प्रत्येक प्रशिक्षण केंद्रात दरवर्षी किमान ६०० ते ७५० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देणे अपेक्षित

आहे. यापैकी ७०% लाभार्थी हे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील असले पाहिजेत या लाभार्थीना प्रशिक्षण देण्यासाठी केंद्र शासन प्रशिक्षणाने निर्गमित केलेल्या Common Cost Norms Notification नुसार Reimbursment पद्धतीने अनुदान अदा केले जाते. माहे नोव्हेंबर, २०२४ अखेर खालीलप्रमाणे प्रगती आहे.

* प्रशिक्षित युवक-युवतींची संख्या : २९९१९६
* रोजगार उपलब्ध युवक-युवतींची संख्या : २२१०५८
* सन २०२३-२४ मध्ये प्रशिक्षण घेतलेले : ३०४०२
* एकूण स्वयंरोजगार प्राप्त २०२३-२४ मधील : २२९४८
* सन २०२४-२५ या वर्षाकरिता रु. ४२.२६ कोटी एवढ्या निधीची तरतूद केलेली आहे.

**६. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) (पूर्वीची इंदिरा आवास योजना)-- (योजना १०)**

केंद्र शासनाने सन २०१६-१७ पासून इंदिरा आवास योजनेचे स्वरूप बदलून प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) राबविण्याचा निर्णय घेतला आहे. योजनेची वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

* प्रति घरकूल बांधकामाकरिता साधारण क्षेत्रात रु. १.२० लक्ष व नक्षलग्रस्त भागाकरिता रु. १.३० लक्ष प्रति लाभार्थी अर्थसहाय देण्यात येत आहे.

* केंद्र व राज्य निधी वाटपाचे प्रमाण ६०:४० असे आहे. त्यानुसार साधारण क्षेत्रात केंद्र हिस्सा रु. ७२,०००/- व राज्य हिस्सा रु. ४८,०००/- व नक्षलग्रस्त भागासाठी केंद्र शासन रु. ७८,०००/- व राज्य शासन रु. ५२,००० असा हिस्सा आहे.

* प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण योजनेचे अर्थसहाय राज्यस्तरावरील बँक खात्यातून PFMS प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या बँक/पोस्ट खात्यात जमा करण्यात येत आहे.

* घरकूल अनुदाना व्यतिरिक्त महात्मागांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत ९०/९५ दिवसांच्या अकुशल मजुरीच्या स्वरूपात रु. २४५७०/२५९३५ पर्यंत अर्थसहाय दिले जाते.

* स्वच्छ भारत अभियानांतर्गत घरकूल लाभार्थ्यांना शौचालयासाठी स्वतंत्रपणे रु. १२,०००/- इतका निधी उपलब्ध करून दिला जातो.

* प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांची निवड सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण, (SECC-२०११) नुसार मधील माहिती लाभार्थ्यांच्या निवडीकरिता वापरण्यात येत आहे.

* प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांची निवड सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण, (SECC-२०११) नुसार तयार करण्यात आलेल्या जनरेटेड प्रायोरिटी लिस्ट (GPL) ग्रामसभेपुढे ठेवून ग्रामसभेने मान्यता दिलेल्या कायमस्वरूपी प्रतिक्षा यादी (PWL) मधून केली जाते व या कायमस्वरूपी प्रतिक्षा यादी (PWL) मधून लाभार्थ्यांना लाभ दिला जातो. तसेच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ज्या पात्र लाभार्थ्यांची नावे जनरेटेड प्रायोरिटी लिस्ट (GPL) मध्ये समाविष्ट नव्हती, त्यांचे साठी ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या सुचनेप्रमाणे व ग्रामसभेच्या मान्यतेने स्वतंत्र "ड" यादी तयार करण्यात आली व या यादीतील लाभार्थ्यांची नोंद आवास प्लस ॲपमध्ये करण्यास आली. ग्रामीण मंत्रालय, भारत सरकार यांच्या सूचने प्रमाणे ग्रामसभेमध्ये या याद्या अंतिम करण्याचे काम पूर्ण झाले आहे व याद्यांमधून सद्य:स्थितीत मंजुरी देण्यात येत आहे.

* प्रधानमंत्री आवास योजना व अन्य ग्रामीण घरकुल योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण गठीत करण्यात आला आहे. कक्षाचे कार्यालय सिडको भवन, ४ था मजला, बेलापूर, नवी मुंबई येथे आहे.

* सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र शासनाकडून ६,३७,०१४ घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून उद्दिष्टांच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडून वितरित करण्यात आलेला पहिल्या हप्त्याचा पहिला भाग रु. ११६६.२५ कोटी व समरूप राज्य हिस्सा रु. ७७७.५० कोटी असा एकूण रु. १९४३.७५ कोटी निधी प्राप्त झाला आहे. (सोबत परिशिष्ट 'ड')

*** पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना-- (योजना १०)**

प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण (पूर्वीच्या इंदिरा आवास योजना) योजनेअंतर्गत प्रतिक्षा यादीमधील घरकूल. पात्र परंतु घरकूल बांधकामासाठी स्वत:ची जागा नसल्यामुळे घरकुलच्या लाभापासून वंचित असलेल्या कुटूंबांना ५०० चौ. फूट जागा खरेदीसाठी प्रति लाभार्थी रु. १,००,०००/- पर्यंत अर्थसहाय देण्यासाठी पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना सुरू करण्यात आली आहे. सदर योजनेसाठी सन २०२४-२५ या वित्तिय वर्षात १८०० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट अपेक्षित असून रु. १३ कोटीची तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे.

*** प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान** (PM-JANMAN)**-- (योजना १०)**

केंद्र शासनाने जनजातीय गौरव दिनानिमित्त दि. १५-११-२०२३ रोजी देशात "प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN)" राबविण्याचा निर्णय घेतला आहे. योजनेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

* योजने अंतर्गत आदिम जमातीतील (कोलाम, कातकरी व माडीया गोंड) पात्र कुटुंबासाठी प्रति घरकुल रु. २.३९ लाख (घरकुल अनुदान रु. २.०० लाख, स्वच्छ भारत अभियानांतर्गत रु. १२ हजार आणि मनरेगा अंतर्गत ९०-९५ दिवसांचे अकुशल वेतन रु. २७ हजार अंदाजे) एवढे अनुदान अनुज्ञेय आहे.

* केंद्र व राज्य निधी वाटपाचे प्रमाण ६०.४० असे आहे. त्यानुसार केंद्र हिस्सा रु. १,२०,०००/- व राज्य हिस्सा रु. ८०,०००/- असा हिस्सा आहे.

* ही योजना प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) च्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात राबविण्यात येते. या योजनेंतर्गत लाभार्थी निवडीचे निकष खालीलप्रमाणे आहेत :-

१) लाभार्थी आदिम जमातीतील संवर्गामधील (कोलाम, कातकरी व माडीया गोंड) असावा.

२) लाभार्थ्याकडे कुठेही पक्के घर नसावे.

३) लाभार्थ्याच्या कुटुंबातील सदस्य शासकीय सेवेत नसावा.

* केंद शासनाकडून सन २०२३-२४ करिता १८,२९४ व सन २०२४-२५ करिता १८,७२० असे एकूण ३७,०१४ एवढे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे.

## ७. राष्ट्रीय रुरबन अभियान (योजना १)

**अभियानाचे स्वरुप :** केंद्र व राज्य पुरस्कृत (६०:४०)

**अभियानाचे उद्दिष्टे :** राष्ट्रीय रुरबन मिशन (National Rurban Mission-NRUM) संपूर्ण देशातील ग्रामीण भागातील गावांच्या समुहांचा आर्थिक, सामाजिक आणि भौतिक विकास करणे आणि शहराप्रमाणे पायाभूत सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने सुरू केले. राज्य शासनाने शासन निर्णय १४ जानेवारी, २०१६ अन्वये सदर अभियान राज्यात राबविण्यास सुरुवात करण्यात आली आहे. सदर अभियानाचा उद्देश पुढीलप्रमाणे आहे :-

* ग्रामीण व शहरी भागातील विकासाचा असमतोल दूर करणे. यामध्ये प्रामुख्याने आर्थिक व तांत्रिक सोयी-सुविधा ग्रामीण भागामध्ये उपलब्ध करून देणे.

* ग्रामीण भागाचा आर्थिक विकास करतांना, गरीब व बेरोजगारी कमी करणे.

* अभियानांतर्गत निवडलेल्या क्षेत्रांचा सर्वांगीण विकास करणे.

* ग्रामीण भागातील गुंतवणुकीस चालना देणे.

**निधी उपलब्धता :** रुरबन अभियान अंतर्गत निवडण्यात आलेल्या गाव समुहांचा विकासासाठी ७०% निधी राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनेतून एककेंद्रभिमुखता (Convergence) द्वारे प्राप्त होणार आहे व उर्वरित ३०% निधी (आदिवासी गाव समुहांसाठी जास्तीत जास्त १५ कोटी व बिगर आदिवासी गाव समुहासाठी जास्तीत जास्त ३० कोटी) "उणिवा निवारण निधी" (Critical Gap Funding) मधून केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० याप्रमाणे निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. उणीवा निवारण निधीच्या २% प्रशासकीय निधी असून ज्यापैकी प्रती गाव समूह ३५.०० लाख रुपये ICAP तयार करण्याच्या अनुषंगाने अग्रीम राज्यास उपलब्ध करून देण्यात आलेले होते.

**योजनेवर झालेला खर्च :**

१. सदर योजनेंतर्गत एकुण २० गावसमुहांचे एकात्मिक गावसमुह कृती आराखडा (ICAP) व सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मंजूर करण्यात आलेले असून, केंद्र शासनाने वितरीत केलेल्या एकुण केंद्र हिस्सा ६०% रक्कम रुपये १४२.७५६ कोटीच्या समरुप राज्य हिस्सा ४०% रक्कम रुपये ९५.१७१ कोटी या सह एकुण रक्कम रुपये २३७.९२७ कोटी रुपये (मंजुर दायीत्व रकमेसह) राज्य शासनाने वितरीत केलेले आहेत.

२. मा. उप संचालक (अर्थसंकल्प), अर्थ विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचे दिनांक २८.०३.२०२२ रोजीचे पत्र व मा. उप सचिव (रुरबन), ग्राम विकास विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे दिनांक ३०.०३.२०२२ रोजीचे पत्रान्वये. दिनांक ३१ मार्च, २०२२ हि दिनांक, श्यामा प्रसाद मुखर्जी रुरबन अभियानाचा Sunset Day म्हणून जाहीर करण्यात आला आहे.

३. सदर अभियानाचा Sunset Day जाहीर करण्यात आल्याने दि. ३१ मार्च, २०२२ पूर्वी अभियानांतर्गत सुरू असलेल्या कामांकरिता रु. १११.८७० कोटी रकमेच्या सुधारित Liability यादीस केंद्र शासनाने DO No : K- ११०१३/०१/२०१९-Rurban Date : ०७-१२-२०२२ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार राज्य व्यवस्थापन कक्षाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

४. अभियानाच्या एकुण रु. ४५०.०० कोटी उणिवानिवारण निधी प्रकल्प रकमेच्या २% प्रशासककीय निधी एकुण रक्कम रुपये ९.०० कोटी अंतर्गत केंद्र हिस्सा-६०% रु.५.४० कोटी केंद्र शासनाने वितरीत करणे अपेक्षीत असतांना रुपये ७.०० कोटी वितरीत केलेले आहेत. त्यामुळे रु. १.६० कोटी जादा वितरीत केलेला निधी केंद्र शासनास परत करावा लागणार आहे. राज्य शासनाने समरुप ४०% हिस्सा रु. ३.६० कोटी वितरीत करणे अपेक्षीत होते. परंतु राज्याने सदर निधी वितरीत न केल्यामुळे रक्कम रुपये ३.६० कोटी प्रशासकिय निधीची तरतुद सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे.

५. केंद्र शासनाने मंजुर केलेल्या दायीत्वासह राज्य शासनाने वितरीत केलेल्या एकूण रक्कम रुपये २३७.९२७ कोटी राज्य शासनाने वितरित केले आहेत. सदर निधीपैकी दिनांक ३१ मार्च, २०२४ अखेर रक्कम रु. ४९,८५,९३,७५१/- "उणिवा निवारण निधी" (Critical Gap Fund) योजनेच्या SNA बँक खात्यावर शिल्लक आहे. सदर शिल्लक निधीतून दायित्वा अंतर्गत असलेल्या कामांची पुर्तता करण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

## (क) केंद्र पुरस्कृत योजना

### १. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (प्रमंग्रासयो) : (बांध २)

१. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यात सन २००० पासून राबविण्यात येत आहे.

२. या योजनेची अंमलबजावणी ग्रामविकास विभागाच्या महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेमार्फत करण्यात येते.

३. प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत सर्वसाधारण क्षेत्रात ५०० पेक्षा जास्त व आदिवासी भागातील २५० पेक्षा जास्त पात्र लोकवस्तीची न जोडलेली गावे बारमाही रस्त्यांद्वारे (वर्षभर चालू राहणारे कलव्हर्ट व क्रॉस ड्रेनेज बांधून) जोडण्यात येतात.

४. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना भाग-१ अंतर्गत टप्पा १ ते १३ मध्ये एकूण २४२०८ कि.मी. लांबीचे रस्ते मंजूर आहेत.

५. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना भाग-२ ही केंद्र शासनाने सन २०१३ मध्ये सुरू केलेली असून ज्या राज्यांनी प्रधानमंत्री ग्राम सडक योजना भाग-१ मध्ये १००% नवीन जोडणी व ९०% दर्जोनतीची कामे प्रदान केलेली आहेत त्या राज्यांसाठी लागू केलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्याला प्रधानमंत्री ग्राम सडक योजना भाग-२ अंतर्गत २५८५.९१ कि.मी. रस्त्यांची लांबी मंजूर करण्यात आलेली आहे.

६. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना भाग-१ व भाग-२ अंतर्गत मंजूर एकूण २६,७९४ कि.मी. लांबीपैकी आतापर्यंत एकूण २६७४६ कि.मी. रस्त्यांचे काम पूर्ण झाले असून रु. ८६७२ कोटी इतका खर्च झाला आहे.

७. प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा ६०:४० असा आहे.

८. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना भाग-३ साठी राज्याला ६,५५० कि.मी. रस्त्याची लांबी मंजूर करण्यात आलेली आहे. त्यानुसार भाग-३ अंतर्गत केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाने मान्यता दिलेल्या रस्त्यांना ग्रामविकास विभाग, शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यत देण्यात आली आहे. सदर शासन निर्णय खालीलप्रमाणे आहेत.

(रुपये कोटीत)

| अ.क्र. | प्रशासकीय मान्यता आदेश | रस्त्याची लांबी कि.मी. | एकूण रुपये |
|---|---|---|---|
| १. | शासन निर्णय क्र. PMGSY-२०२१/ C.R. ८६/Bandhkam-२, दि. २९-०६-२०२१ | २५८१.७२ | १९१९.७६ |
| २. | शासन निर्णय क्र. PMGSY-२०२१/ C.R. ८६/Bandhkam-२, दि. २०-०८-२०२१ | २२७.६५ | १७२.६१ |
| ३. | शासन निर्णय क्र. PMGSY-२०२१/ C.R. ८६/Bandhkam-२, दि. २२-११-२०२१ | ११६.५५ | ८५.०९ |
| ४. | शासन निर्णय क्र. PMGSY-२०२१/ C.R. ८६(Part-३)/Bandhkam-२, दि. ०६-०३-२०२३ | २५५१.६३३ | २०३९.८५७२ |
| ५. | शासन निर्णय क्र. PMGSY-२०२१/ C.R. ११६/Bandhkam-२, दि. १५-०३-२०२४ | २७६.५९ (२३३ पुलांची कामे) | २३५.५५ |
| ६. | शासन निर्णय क्र. PMGSY-२०२१/ C.R. ३००/Bandhkam-२, दि. २७-०९-२०२४ | ७४५.२८६ | ६५५.६६ |
| | **एकूण** | **६४९९.४२९** | **५१०८.५२७२** |

**२. राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान : (आस्था १५)**

केंद्र शासनाने पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी केंद्र शासनाच्या **"राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान"** या योजनेचे पुनर्गठन करून **"राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान"** ही योजना सन २०१८-१९ पासून लागू केली आहे. सदर योजना केंद्र शासन पुरस्कृत असून या योजनेची महाराष्ट्र राज्यात सन २०१८-१९ ते २०२१-२२ या कालावधीकरिता लागू केली आहे. तद्नंतर सदर योजनेचे रुपांतर केंद्र शासनाने **"पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान"** या योजनेमध्ये केले असून सदर **योजनेचा कालावधी सन २०२२-२३ ते सन २०२५-२६** केलेला आहे. याबाबत दिनांक १६-०९-२०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून त्यानुसार सदर योजना राबविण्यात येत आहे. या योजनेकरिता सन २०२४-२५ व सन २०२५-२६ करिता खालीलप्रमाणे निधी अर्थसंकल्पित तरतूद करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | | सन २०२४-२५ साठी अर्थसंकल्पित तरतूद वेतनेतर | सन २०२५-२६ साठी प्रस्तावित तरतूद वेतनेतर |
|---|---|---|---|---|
| १. | राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान | केंद्र हिस्सा ६०% | १७९६५.११ | १९७६१.६२ |
| | (सर्वसाधारण घटक) | राज्य हिस्सा ४०% | ११९७६.७४ | १३१७४.४२ |
| | | **एकूण** | **२९९४१.८५** | **३२९३६.०४** |
| २. | पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान | केंद्र हिस्सा ६०% | २१३०.५७ | २३४३.६२ |
| | (आदिवासी घटक) | राज्य हिस्सा ४०% | १४२०.३८ | १५६२.४१ |
| | | **एकूण** | **३५५०.९५** | **३९०६.०३** |
| ३. | पुनर्रचित राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान | केंद्र हिस्सा ६०% | २८२२.२१ | २९६०.२३ |
| | (अनुसूचित जाती घटक) | राज्य हिस्सा ४०% | १८८१.४७ | १९७३.४९ |
| | | **एकूण** | **४७०३.६८** | **४९३३.७२** |

**३. सांसद आदर्श ग्राम योजना : (योजना ५)**

**योजनेचे स्वरूप - १०० टक्के केंद्र पुरस्कृत**

**योजनेचे स्वरूप :--**

महात्मा गांधीच्या विचारधारेतून मिळालेल्या प्रेरणेने त्यांना अपेक्षित असलेले आदर्श गाव साकारण्यासाठी मा. पंतप्रधानांनी स्वातंत्र्यदिनी सांसद आदर्श ग्राम (SAGY) योजनेची रुपरेषा मांडली आहे. त्यानुसार ग्रामीण भारताच्या मूळ स्वरुपाला बाधा न आणता, गावोगावी सगळ्या सुखसोई उपलब्ध करून ग्रामस्थांना स्वत:चे भवितव्य ठरविण्याची संधी उपलब्ध करून देणारी ही योजना दिनांक ११ ऑक्टोबर, २०१४ पासून सुरू करणेत आली आहे. सक्षम आणि पारदर्शक पंचायती, ग्रामस्थांचा स्थानिक कारभारात सहभाग वाढवून लोकशाहीची मुळे घट्ट करणे आणि चांगली शासन व्यवस्था निर्माण करणे हे या योजनेचे महत्वाचे उद्दिष्ट आहे.

या योजनेबाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना दिनांक ११ ऑक्टोबर २०१४ रोजीच्या दिशा निर्देश पुस्तिकेमध्ये देण्यात आल्या आहेत. तसेच राज्य शासनाने दिनांक ३१ डिसेंबर २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार योजनेच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

सांसद आदर्श ग्राम योजनेचा सन २०१४-१९ या कालावधीचा पहिला टप्पा दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी समाप्त झाला आहे. यानंतर दुसरा टप्पा सन २०१९-२४ सुरू आहे.

केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत सुरू www.saanjhi.gov.in असलेले संकेतस्थळ संपर्क व ऑनलाईन अहवाल याकरिता उपलब्ध आहे. याबाबत ग्रामीण विकास मंत्रालयाकडून वेळोवेळी पाठपुरावा करत असते. योजनेच्या मराठीत रुपांतरित मार्गदर्शक सूचना पोर्टलवर अपलोड आहेत.

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे या योजनेला कोणताही स्वतंत्र निधी नाही, परंतु सुरु असलेल्या केंद्र व राज्य पुरस्कृत विविध योजनांच्या कृती संगमातून निधी उपलब्ध करणेचा आहे. तसेच मा. खासदार निधी व CSR Fund उपलब्ध करणेचा आहे.

राज्यस्तरावर राज्य नोडल अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान कक्ष कार्यरत आहे. मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समिती गठित केली असून मा. सचिव, ग्रामविकास हे सदस्य सचिव आहेत. या समितीच्या आतापर्यंत चार बैठका संपन्न झाल्या आहेत. या कार्यक्रमासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी हे जिल्हा नोडल अधिकारी आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे सह समन्वयन अधिकारी आहेत. तसेच जिल्हा नियोजन अधिकारी हे जिल्हास्तरीय संपर्क अधिकारी म्हणून आहेत.

सांसद आदर्श ग्राम योजना - २ (२०१९-२४) अंतर्गत १७ व्या लोकसभेच्या प्रत्येक मा. संसद सदस्यांनी त्यांचे मतदारसंघात दरवर्षी १ याप्रमाणे ५ गांवे निवडून ती सन २०२४ पर्यंत आदर्श ग्राम म्हणून विकसित करावयाची आहेत. याकरिता ग्रामपंचायत हे एकक आहे.

**प्रगती अहवाल**
**महाराष्ट्र राज्य**
**सांसद आदर्श ग्राम योजना (२०१९-२०२४)**

| टप्पे | निवडण्यात आलेल्या ग्रामपंचायती | पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ग्राम विकास आराखड्याची संख्या | एकूण कामे | पूर्ण करण्यात आलेली कामे | प्रक्रियाधीन असणारी कामे | अद्याप सुरू न झालेली कामे | ग्रामविकास माहिती अद्ययावत केलेल्या टप्पे झालेली ग्रामपंचायतींची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| टप्पा IV | ४१ | ३३ | १६१६ | ३७८ | ७० | ११६८ | १५ |
| टप्पा V | २४ | १८ | १११३ | ३२९ | १९ | ७६५ | १० |
| टप्पा VI | २३ | १५ | ५५५ | ११८ | १९ | ४१८ | ६ |
| टप्पा VII | २५ | १७ | ५२५ | ९० | ३३ | ४०२ | ८ |
| टप्पा VIII | २० | ७ | ३७० | ७९ | ३ | २८८ | ३ |
| एकूण | **१३३** | **९०** | **४१७९** | **९९४** | **१४४** | **३०४१** | **४२** |

**४. नवीन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत व्यवस्थापन कार्यक्रम : (योजना ५)**

**योजनेचे स्वरूप :** १०० टक्के केंद्र पुरस्कृत.

**योजनेचा तपशील :** पारंपरिक ऊर्जा साधने जसे पेट्रोल, केरोसिन, कोळसा, नैसर्गिक वायू व लाकडी इंधन ही काळाच्या ओघात संपणारी ऊर्जा साधने आहेत. यांच्या वापरावरील भार कमी करण्यासाठी, ग्रामीण भागातील स्त्रियांचे जीवनमान सुधारण्यासाठी, सर्वसाधारण स्वच्छता तसेच पर्यावरण संतुलन राखण्यासाठी सन १९८२-८३ पासून शासनाने राष्ट्रीय बायोगॅस विकास कार्यक्रम ही १०० टक्के केंद्रीय क्षेत्र योजना कार्यान्वित केली आहे.

सदर योजना जिल्हास्तरावर कृषी विकास अधिकारी, कृषी विभाग जिल्हा परिषद यांचेमार्फत राबविण्यात येते. या योजनेंतर्गत केंद्र शासन दरवर्षी राज्यास बायोगॅस संयंत्राचे उद्दिष्ट ठरवून देते. ठरवून दिलेले उद्दिष्ट राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना वाटप करण्यात येते. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी केंद्र शासन राज्यास १००% निधी २ ते ३ हप्त्यात उपलब्ध करून देते.

**योजनेचे निकष खालीलप्रमाणे**

१. योजना राबविताना लाभार्थी असलेल्या गावांचा समूह करून योजना राबविण्यात यावी.

२. बायोगॅस संयंत्राची मागणी निश्चित करताना लोकाचा सहभाग घ्यावा.

३. दोन किंवा अधिक जनावरे असलेल्या कुटुंबाची लाभार्थी म्हणून निवड करणे.

४. दोन किंवा अधिक जनावरे असलेल्या कुटुंबाची संख्या जास्त असल्यास अशा गावांच्या समुहाची निवड करणे.

५. ज्या जिल्ह्यात बायोगॅस संयंत्र कार्यान्वित राहण्याचे प्रमाण अधिक आहे व संयंत्राच्या देखभाल व दुरुस्तीच्या सुविधा उपलब्ध आहेत, अशा भागास अधिक बायोगॅस संयंत्राचे उद्दिष्ट देण्यात यावे.

६. उद्दिष्टांचे वाटप करताना स्वयंसेवी संस्था, उद्योजकांकडील प्रशिक्षित गवंड्यांची संख्या विचारात घेऊन बायोगॅस संयंत्रे वाटप करावेत.

केंद्र शासनाने १४ व्या वित्त आयोगामध्ये बायोगॅस संयंत्र बांधकामाचे नवीन दर निश्चित करून दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी नवीन सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमीत केलेल्या आहेत. सदरचे दर सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून लागू करण्यात आले आहेत.

याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे :--

राज्यात बायोगॅसची तंत्रशुद्ध पद्धतीने उभारणी व्हावी म्हणून संयंत्र बांधणाऱ्या गवंड्यांना व ट्रेनर्सना या योजनेखाली प्रशिक्षण व उजळणी प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षित झालेल्या गवंड्यांकडून बायोगॅस संयंत्रे बांधली जातात. बायोगॅस संयंत्राचा वापर व देखभाल दुरुस्ती करण्यासंदर्भात लाभार्थ्यांनासुद्धा प्रशिक्षण देण्यात येते. राज्यात सर्वसाधारणपणे दीनबंधू व के. व्ही.आय. सी याप्रकारची बायोगॅस संयंत्रे बसविली जातात.

केंद्र शासनाकडील दिनांक ०२.११.२०२२ रोजीच्या मार्गदर्शक सूचनेतील सुधारीत दर खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | बाब | संयंत्राचे आकारमान | केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान (प्रति संयंत्रास) |
|---|---|---|---|
| अ | सर्वसाधारण लाभार्थी | १ घ. मी. | रु. ९,८००/- |
| | | २ ते ४ घ.मी. | रु. १४,३५०/- |
| | | ५ वे ७ घ.मी. | रु. २२,७५०/- |
| | अनुसूचित जाती/जमाती | १ घ. मी. | रु. १७,०००/- |
| | | २ ते ४ घ.मी. | रु. २२,०००/- |
| | | ५ वे ७ घ.मी. | रु. २९,२५०/- |
| ब | i) बायोगॅस संयंत्र शौचालयास जोडल्यास | १ ते १० घ. मी. | रु. १६००/- |
| | ii) MNRE मान्य बायोगॅस स्लरी युनिट | १ ते २५ घ. मी. | रु. १६००/- |
| क | टर्न की फी (५ वर्षाच्या हमी कालावधीतील देखभाल व दुरुस्तीसाठी) (Turn Key Job fee for construction, supervision, commissioning & free O & M warraty for 5 years trouble free operations.) | १ ते १० घ. मी. | प्रति संयंत्र रु. ३०००/- १ ते १० घ.मी. आकारमान असलेल्या संयंत्रासाठी व प्रति संयंत्र रु. ५०००/- १५ ते २५ घ.मी. आकारमान असलेल्या संयंत्रासाठी मात्र टर्न की जॉब फी पूर्वनिर्मित/ उत्पादित बायोगॅस संयंत्रांसाठी पात्र असणार नाही. |
| ड. | संयंत्र उभारणीसाठी भौतिक साध्यानुसार दिली जाणारी प्रशासकीय खर्चासाठीची रक्कम | | |
| | १. १००-१९९९ | रु. १,००,०००/- (१०० पेक्षा जास्त संयंत्र उभारणीस) | |
| | २. २०००-५००० | रु. १०,५०,०००/- (२००० पेक्षा जास्त संयंत्र उभारणीस) | |
| | ३. ५००१ पेक्षा जास्त | रु. २४,५०,०००/- (५००० पेक्षा जास्त संयंत्र उभारणीस) | |

| अ.क्र. | बाब | संयंत्राचे आकारमान | केंद्र शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान (प्रति संयंत्रास) |
|---|---|---|---|
| ई. | प्रशिक्षण शुल्क | | |
| | १. लाभार्थी प्रशिक्षण | | रु. ४,०००/- |
| | २. कर्मचारी प्रशिक्षण | | रु. १०,०००/- |
| | ३. रिफ्रेशर कोर्स/बांधकाम व देखभाल कोर्स | | रु. ५०,०००/- |
| | ४. स्वयंसेवी संस्थांना/टर्न की वर्कर यांना बायोगॅस संयंत्र व व्यवस्थापन कार्यक्रमाचे प्रशिक्षण दिल्यास | | रु. ७५,०००/- |
| | बायोगॅस कार्यक्रम अंमलबजावणीसाठी १ ते २५ घ.मी. पर्यंतच्या बायोगॅस संयंत्रासाठी PIAs ला अतिरिक्त प्रोत्साहन | | |
| १. | रुपये ५००/- प्रति संयंत्र, १०० पेक्षा जास्त संयंत्राकरिता | | |
| २. | रुपये ४५०/- प्रति संयंत्र, २,००० पेक्षा जास्त संयंत्राकरिता | | |
| ३. | रुपये ४००/- प्रति संयंत्र, ५,००० पेक्षा जास्त संयंत्राकरिता | | |
| उ. | प्रचार व प्रसिध्दी | | |
| १ | १००० संयंत्रांपर्यंत | | रु. २,००,०००/- |
| २ | १००१ ते १०,००० संयंत्रांपर्यंत | | रु. ४,००,०००/- |
| ३ | १०,००० पेक्षा जास्त संयंत्रांकरिता | | रु. ६,००,०००/- |
| ऊ. | अकार्यरत संयंत्रांच्या दुरुस्तीसाठी राज्यास प्राप्त होणाऱ्या नियतव्ययापैकी ५% नियतव्य वापरण्यात यावा. | | लाभार्थ्याने दुरुस्तीच्या खर्चापैकी ५०% खर्च केल्यास ५०% केंद्रीय सहाय्य मिळणेस पात्र. |

अकार्यरत संयंत्राच्या दुरूस्तीसाठी राज्यास लाभार्थीने दुरूस्तीच्या प्राप्त होणाऱ्या नियतव्यापैकी ५ टक्के नियतव्यय वापरण्यात यावा खर्चापैकी ५० टक्के रक्कम खर्च केल्यास ५० टक्के केंद्रीय सहाय्य मिळण्यास पात्र.

राज्यात बायोगॅसची तंत्रशुद्ध पद्धतीने उभारणी व्हावी म्हणून संयंत्र बांधणाऱ्या गवंड्यांना व ट्रेनर्सना या योजनेखाली प्रशिक्षण व उजळणी प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षित झालेल्या गवंड्यांकडून बायोगॅस संयंत्रे बांधली जातात. बायोगॅस संयंत्राचा वापर व देखभाल दुरुस्ती करण्यासंदर्भात लाभार्थ्यांनासुद्धा प्रशिक्षण देण्यात येते. राज्यात सर्वसाधारणपणे जनता, दीनबंधू व के.व्ही.सी. या प्रकारची बायोगॅस संयंत्रे बसविली जातात .

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता सर्वसाधारण प्रवर्ग - २१००, SC प्रवर्ग - ४०० व ST प्रवर्ग - २०० असे एकूण २७०० एवढ्या बायोगॅस संयंत्रासह ७५ शौचालय जोडणी उदिष्ट, ५ गवंडी प्रशिक्षण, ५० लाभार्थी प्रशिक्षण, ३ कर्मचारी प्रशिक्षण व ४ टर्न की प्रशिक्षणाचे उद्दिष्ट केंद्र शासनाकडून प्राप्त झाले आहे.

**५. केंद्रीय स्वामित्व योजना (पंरा-४)**

(१) दि. २४ एप्रिल, २०२० रोजी पंचायत राज दिनानिमित्त मा. पंतप्रधान महोदयांनी संपूर्ण देशामध्ये स्वाभित्व (SVAMITVA-Survey of Villages And Mapping With improvised Technology in Village Areas) ग्रामक्षेत्रातील गावांचे सर्वेक्षण आणि प्रगत तंत्रज्ञानाद्वरे नकाशारेखन योजना राबविण्यास मान्यता दिली आहे. स्वामित्व योजनेच्या अनुषंगाने केंद्र शासनाने मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

(२) केंद्र शासनाच्या योजनेची थोडक्यात माहिती देशामध्ये सुमारे ६.६२ लाख गावे असून ती अखेरपर्यंत या योजनेच्या कक्षेत आणण्यात येणार आहेत. सदर योजनेचा कालावधी सन २०२०-२१ ते सन २०२३-२४ असा ४ वर्षाचा आहे. सन २०२०-२१ या वर्षाकरिता ही योजना पथदर्शी टप्प्यात (Pilot Project) हरियाणा, कर्नाटक, मध्यप्रदेश, महाराष्ट्र उतर प्रदेश, उत्तराखंड ह्या ६ राज्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्यात साधारणत:४४,००० गावे असून सन २०२०-२१ या वर्षामध्ये राज्यातील ५०% गावे म्हणजेच २२,००० गावे सामाविष्ट करणेत येणार आहेत. सदर योजनेचा कालावधी जरी ४ वर्षाचा असला तरी राज्यातील सर्व गावांचे सर्वेक्षण हे २ वर्षात करण्याचे प्रस्तावित आहे.

भारत सरकारने "स्वामित्व" ही केंद्रीय क्षेत्र योजना ग्रामीण भागाकरिता एकात्मिक मालमत्ता विधिग्राह्यता उपाय उपलब्ध करणे (Record of Right) या उद्देशाने अंमलात आणण्याचे ठरविलेले आहे. उक्त योजना पंचायती राज विभाग, भारत सरकार, राज्याचा ग्रामविकास व महसूल विभाग आणि भारतीय सर्वेक्षण विभाग (Soi) यांच्या सहयोगी प्रयत्नातून, ड्रोन सर्वेक्षण तंत्रज्ञानाचा वापर करून आबादी क्षेत्रांचे (आबादी क्षेत्रामध्ये ग्रामीण क्षेत्रातील निवासी जमीन, आबादी क्षेत्राच्या लगतची निवासी क्षेत्र आणि वाड्या/वस्त्या यांचा समावेश होतो) सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

गावातील निवासी ग्रामीण क्षेत्रामध्ये मालकीची घरे असलेल्या गावातील घरमालकांना यामुळे "अधिकार अभिलेख" पुरवला जाईल, ज्याच्या परिणामी, त्यांना बँकाकडून कर्ज आणि इतर वित्तीय लाभ घेण्याकरिता आपल्या मालमत्तेचा एक वित्तीय मत्ता म्हणून वापर करणे शक्य होईल. याशिवाय कर संकलनास बळकटी आणण्याकरिता ग्रामपंचायतीना मदत होईल.

**योजनेची उद्दिष्टे**

१. ग्रामीण भारतातील नागरिकांना कर्ज आणि इतर वित्तिय लाभ घेता यावेत याकरिता त्यांच्या मालमत्तेचा एक वित्तीय मत्ता म्हणून वापर करणे त्यांना शक्य व्हावे म्हणून वित्तीय स्थिरता आणणे.

२. ग्रामीण नियोजनाकरिता अचूक भूमी-अभिलेख निर्माण करणे.

३. मालमत्ता कराचे निर्धारण करणे.

४. सर्वेक्षणविषयक पायाभूत सुविधा आणि भौगोलिक माहिती प्रणाली नकाशे निर्माण करणे, ज्याचा कोणत्याही विभागास आपल्या कामाकरिता वापर करता येईल.

५. भौगोलिक माहिती प्रणाली नकाशांचा वापर करून, उत्तम दर्जाचा ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्यात सहकार्य करणे.

६. मालमत्ता सबंधित विवाद व कायदेशीर प्रकरणे कमी करणे

**संबंधित घटक व भूमिका**

या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये पुढील घटक समाविष्ट असतील

१. केंद्रीय मंत्रालय (पंचायती राज मंत्रालय), भारत सरकार

२. भारतीय सर्वेक्षण विभाग (तंत्रज्ञान अंमलबजावणी अभिकरण)

३. राज्य महसूल विभाग

४. राज्य पंचायती राज विभाग

५. स्थानिक जिल्हा प्राधिकरणे

६. मालमत्ता मालक

७. ग्रामपंचायत

८. राष्ट्रीय माहिती केंद्र भौगोलिक माहिती प्रणाली विभाग

९. व्यापक आधार सामग्री तयार करण्याकरिता, ग्रामीण आबादी क्षेत्रांमध्ये मत्ता असलेले इतर क्षेत्रीय विभाग

**सनियंत्रण आणि मूल्यमापन**

समायोजित संनियंत्रण करण्यासाठी, माहिती देण्यासाठी आणि कार्यक्रमात सुधारणा करण्यासाठी (जेथे आवश्यक असेल तेथे) त्रिस्तरीय सनियंत्रण व मूल्यमापन चौकट तयार करण्यात येईल. हि राष्ट्रीय पातळीवर, राज्य पातळीवर व जिल्हा पातळीवर वापरण्यात येईल आणि यामध्ये यासंबंधी निर्णय घेणाऱ्या व्यक्ती व त्या विषयातील तज्ञ व्यक्तींचा समावेश असेल.




**(३) विभागामार्फत चालू आसलेल्या गावठाण जमाबंदी प्रकल्पाची थोडक्यात माहिती**

राज्यातील सर्व गावांच्या गावठाणामधील जमिनींचे GIS आधारित सर्वेक्षण व भूमापन करणेबाबतची "गावठाण जमाबंदी प्रकल्प" योजना ग्रामविकास विभाग, जमाबंदी आयुक्त यांचे कार्यालय व भारतीय सर्वेक्षण विभाग, डेहराडून यांच्या संयुक्त सहभागाने राबविण्यास मा. मंत्रिमंडळाने दि. २९ जानेवारी, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय दि. २२ फेब्रुवारी २०१९ रोजी निर्गमित करणेत आलेला आहे. सदर योजना प्रामुख्याने २ टप्प्यात राबविण्यात येत आहे.

१. राज्यातील सर्व गावांच्या मिळकतींचे अधिकार अभिलेख तयार करणे :-

२. गावातील सर्व मालमत्ताचे GIS प्रणालीवर आधारित मालमत्ता पत्रक (Property Card) तसेच मालमत्ता नोंदवही तयार करणे.

**(४) सदरील प्रकल्पांतर्गत जमाबंदी आयुक्त, पुणे यांना खालीलप्रमाणे निधी वितरित करण्यात आला आहे.**

| क्र. | निधी वितरण शासन निर्णय | वितरित निधी |
|---|---|---|
| १ | दिनांक २ मार्च, २०१९ | रुपये २ कोटी |
| २ | दिनांक १२ एप्रिल, २०१९ | रुपये ४ कोटी |
| ३ | दिनांक २२ एप्रिल, २०१९ | रुपये ४ कोटी |
| ४ | दिनांक १६ नोव्हेंबर, २०१९ | रुपये ३४.६८ कोटी |
| ५ | दिनांक ३० मार्च, २०२१ | रुपये १९ कोटी |
| | **एकूण** | रुपये ६३.६८ कोटी |

**(५)** स्वामीत्व योजनेअंतर्गत उपलब्ध माहितीनुसार दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ अखेर महाराष्ट्रातील ४५०५५ गावांपैकी, २०१८७ गावांचे अंतिम नकाशे तयार झाले असून एकूण मिळकत पत्रिकांची संख्या २३८७८७३ आहे.

**६. राष्ट्रीय पंचायत पुरस्कार :-(पंरा-१)**

**पंडीत दिनदयाळ उपाध्याय पंचायत सशक्तीकरण पुरस्कार :** सन २०१५-१६ या वर्षापासून ही योजना Online करण्यात आली व ती "पंडीत दिनदयाळ उपाध्याय पंचायत सशक्तीकरण अभियान" या नावाने ओळखली जाऊ लागली. सन २०२३ मध्ये या योजनेचे नाव "राष्ट्रीय पंचायत पुरस्कार" असे करण्यात आले असून योजनेमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात आले. राष्ट्रीय पंचायत पुरस्कार ही पंचायती राज संस्थांची (PRIs) पंचायत समिती, जिल्हा परिषद, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील ९ थीम (पंयायती राज मंत्रालयाच्या तज्ञ समितीद्वारे ओळखली जाणारी) बहुस्तरीय पिरॅमिड स्पर्धा असेल. शाश्वत विकास उद्दिष्टांचे ९ स्थानिकीकरण (LSDG) थीम आहेत (१) गरिबी मुक्त आणि उपजीविका (रोजगार) वृद्धीस पोषक गाव (२) आरोग्य दायी गाव (३) बालस्नेही गाव (४) जलसमृद्ध गाव (५) स्वच्छ व हरित गाव (६) स्वयंपूर्ण पायाभूत सुविधा युक्त गाव (७) सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव (८) सुशासन युक्त गाव (९) लिंग समभाव पोषक गाव पंचायतींना या थीम अंतर्गत SDGs प्राप्त करण्यासाठी त्यांच्या कामगिरीसाठी प्रोत्साहन दिले जाते.

**अधिकारांचे पंचायत राज संस्थाकडे विकेंद्रीकरण :** दिनांक २० एप्रिल, १९९३ रोजी झालेल्या ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार भारतीय राज्य घटनेमध्ये भाग ९ अंतर्भूत करण्यात आला आहे. तसेच त्यातील अनुच्छेद २४३ जी अन्वये राज्याचे विधिमंडळ कायदे करून स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार प्रदान करत असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने अधिकारांचे पंचायत राज संस्थांकडे विकेंद्रीकरण करण्यासाठी घटनेतील अनुसूची ११ मधील २९ विषय पंचायत राज संस्थाकडे हस्तांतरित करावयाचे आहेत. त्यानुसार राज्य शासनाने निरनिराळ्या विभागाकडील आजपर्यंत २९ विषयांपैकी १४ विषय व संबंधित योजना कर्मचाऱ्यांसह जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केल्या आहेत.

## २. पंचायत राज संस्थांना स्व-उत्पन्नविषयक बाबींसाठी अर्थसहाय्य

**(अ) जिल्हा परिषदांना स्व-उत्पन्नविषयक विविध बाबींसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाचा तपशील (वित्त ३) :**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना स्व-उत्पन्न म्हणून जमीन महसूल उपकर, वाढीव उपकर, मुद्रांक शुल्क, वन महसूल अनुदान, व्यवसाय कर, व्यवसाय व्यापार व अजिविका, यावरील उपकर मोटर वाहन कर ही अनुदाने उपलब्ध करून दिली जातात.

